ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
जून २०२३
किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४ वर्ष : ६८
अंक : ३
पुणे.

Jeevan Shikshan
June 2023
Price ₹30
Pages 44 Vol. : 68
Issue : 3
Pune.

# जीवन शिक्षण

## वाचन सिद्धी विशेषांक - भाग १



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,
पुणे येथे ६४ वा महाराष्ट्र दिन आणि
आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने
ध्वजारोहण करण्यात आले.
याप्रसंगी परिषदेचे संचालक मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर
(भा.प्र.से.), सहसंचालक मा. श्री. रमाकांत काठमोरे,
उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, डॉ. नेहा बेलसरे,
डॉ. माधुरी सावरकर, श्री. सागर व्हटकर तसेच परिषदेतील
सर्व विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी वर्ग आणि
कर्मचारी उपस्थित होते.





# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६८ | जून, २०२३ | अंक ३ रा

❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) — **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** — **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** — **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि
सा. शास्त्रे व कला-क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** — **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**ज्योती उपाशी,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू) — **सदस्य सचिव**

❖ **निर्मिती सहायक :**
अरुण जाधव, अधिव्याख्याता, प्रसारमाध्यम व सी.पी.डी. विभाग

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,२५०

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**

## वाचन सिद्धी विशेषांक - भाग १

## अंतरंग

| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास | डॉ. पंडित विद्यासागर | ५ |
| ❖ साद पुस्तकांची! वाचनाच्या आनंदाची! | प्रवीण दवणे | ७ |
| ❖ वाचन संस्कृती जोपासण्यासाठी... | अजित राक्षे | ९ |
| ❖ वाचन - एक प्रेरणा स्रोत | विद्या दामोदरे | १३ |
| ❖ New Dimensions of Reading Skills | Dr. Deepak Gund | १५ |
| ❖ वाचनाचे जीवनातील महत्त्व | कामिनी पवार | १८ |
| ❖ वाचन संस्कृतीच्या विकासात शाळेची भूमिका | डॉ. गोविंद नांदेडे | २० |
| ❖ पुस्तके वाचूया, जीवन घडवूया! | संदीप वाकचौरे | २३ |
| ❖ पुस्तक मैत्री | वंदना कुलकर्णी | २६ |
| ❖ वाचन संस्कृती वाढविणारी शाळा, म्हणजे 'ज्ञानपोई' | प्रा. बी. एन. चौधरी | ३० |
| ❖ वाचन : एक समृद्ध करणारा प्रवास | डॉ. जितेंद्र काठोळे | ३२ |
| ❖ डिजिटल वाचन | डॉ. विशाल तायडे | ३५ |
| ❖ माझे वाचन विश्व | डॉ. कैलास दौंड | ३८ |
| ❖ शिक्षण जीवन कौशल्यांचे | अरुण जाधव | ४१ |
| ❖ भाषिक खेळ | लक्ष्मण शेडगे | ४१ |
| ❖ इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०. **दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



मित्रांनो,

शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हायला हवा. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचा अन्योन्य संबंध आहे हे अनेक उदाहरणांवरून सिद्ध होते. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.

'केलेले वाचन व त्याचा दैनंदिन जीवनात वापर करणे ही एक कला आहे. वाचनाने समाजात वावरण्याचा आत्मविश्वास वाढतो. वाचनाची सवय ही स्वतःला सिद्ध करण्यासाठीदेखील साहाय्यभूत ठरते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने शालेय वयापासूनच वाचनाची सवय अंगी बाणवली पाहिजे'. आजच्या स्पर्धेच्या युगात बाह्यलक्षी न बनता आत्मलक्षी बनले पाहिजे. वाचताना आपला पुस्तकाच्या लेखकाशी संवाद सुरू असतो. भरपूर वाचन करणारी माणसे वाचनातून जीवनाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन शिकत जातात व हाच अनुभव त्यांच्या मुलांनाही देऊ शकतात.

मुलांना पुस्तके वाचून दाखवत असताना, जर काय महत्त्वाचे असेल तर त्यातील आशय. उदाहरण द्यायचे झाले, तर एखादे गोष्टीचे पुस्तक घ्या व ते वाचताना त्यातील पात्रे आयुष्यातील निर्णय कसा घेतात, अवघड प्रसंगातून मार्ग कसा काढतात, नैराश्य आल्यास काय करतात, असे स्वभावातील विविध कंगोरे समजावून सांगितल्यावर मुलांवर उत्तम प्रकारचे संस्कार होतात. मुलांचे मन संवेदनशील असते व नवीन विषय ग्रहण करण्याची जबरदस्त क्षमता त्यांच्यामध्ये असते. या उपजत गुणांचा उपयोग करून घेतल्यास सकारात्मक विचार व जीवनात येणाऱ्या संकटांना तोंड देण्याची जी क्षमता प्रत्येकामध्ये असते ही समज अगदी लहान वयातच येऊ शकते.

दैनंदिन जीवनात वावरताना विविध स्वभावाची व प्रवृत्तीची माणसे भेटतात. प्रत्येकाशी योग्य त्या पातळीवर संवाद साधून मार्ग काढायचा असतो. लहान मुले निरागस व निर्मळ मनाची असल्याने इतरांवर सहज विश्वास ठेवण्याचा संभव असतो. अशा वेळेस योग्य मार्गदर्शन केल्यास स्वतःची ओळख निर्माण करण्यास योग्य बनतात. लहान मुलांची पुस्तके निवडताना विषय कोणते असावेत हे फार महत्त्वाचे ठरते. महान व्यक्तींची चरित्रे, सामान्यज्ञान, शौर्य कथा, विज्ञान, खगोलशास्त्र, इतिहास, काव्य, कला, निसर्गसृष्टी इत्यादी विविध विषय घेतल्यास, त्यांतील नक्की कोणत्या विषयात आपल्याला रुची वाटते याची निवड मुले लहान वयातच करू लागतात.

पुस्तके वाचल्यावर त्यातील पात्रे व काल्पनिक प्रसंग मुले लक्षात ठेवतात व खऱ्या जगात वावरत असताना गोष्टीतील पात्रे कशी वागतात त्याप्रमाणे त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात; म्हणूनच पराक्रमी योद्धे, कलाक्षेत्रातील मान्यवर, संशोधक, क्रांतिकारी पुरुष व स्त्रिया यांची चरित्रे वाचनात आली, तर मुलांसाठी तो एक उत्तम प्रेरणेचा स्रोत बनतो.

मुलांनी पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर पूरक वाचन करावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजकाल मोबाईल वापराच्या वाढत्या प्रमाणामुळे लहान मुले वाचनाकडे दुर्लक्ष करताना दिसतात; म्हणूनच पालकांनी विशेष वेळ काढून वाचनाची सवय लावल्यास मुलांची बुद्धिमत्ता प्रगल्भ होण्यास व त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन व्यापक बनण्यास मदत होते.

योग्य उद्देश ठेवून मुलांना वाचनाची आवड लावणे हे फारसे अवघड नाही. त्यासाठी प्रयत्न केल्यास व सातत्य टिकविल्यास मुलांमध्ये सकारात्मक बदल होण्यास फार वेळ लागणार नाही. लहान मुलांची ग्रहणशक्ती उत्तम असल्याने संस्कारांचा परिणाम त्यांच्यावर फार लवकर होतो व पालकांना उच्च दर्जाचे समाधान मिळते यात शंका नाही. सदर अंक हा 'वाचन' या घटकावर आधारित आहे म्हणून याचे नाव 'वाचन सिद्धी' असे दिले आहे. आपण नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात नवनवीन पुस्तकांच्या वाचनाने करूया आणि स्वतःस सिद्ध करूया.

सर्व विद्यार्थ्यांना नूतन शैक्षणिक वर्षासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
तथा संपादक, जीवन शिक्षण

# वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास

**डॉ. पंडित विद्यासागर**
मा. कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

*वाचनाने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. ही गोष्ट सांगताना लेखकाने स्वतःला सर्वांगाने ज्ञान समृद्ध होण्यासाठी वाचनाचा कसा उपयोग झाला, या संदर्भात उदाहरणांसह विवेचन या लेखात केले आहे.*

अलीकडील काळात भारताचे राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांनी वाचनाचा प्रसार केला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर वाचनाचा खूप मोठा प्रभाव होता. त्यामुळेच आपण त्यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरी करतो. अनेक नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व घडल्याचे सांगितले आहे. माझ्या व्यक्तिमत्त्वावरही वाचनाचा खूप मोठा प्रभाव आहे.

१९६० च्या दशकात इतर माध्यमांचा प्रभाव अत्यल्प होता. रेडिओ असला तरी तो सगळ्यांकडे उपलब्ध नव्हता. खेड्यातील परिस्थिती तर आणखी बिकट होती. वाचनासाठी वर्तमानपत्रे आणि पुस्तकांची वानवा होती. माझे बालपण ज्या खेड्यात गेले, तेथील परिस्थितीही अशीच बिकट होती. सुदैवाने वडिलांनी घेतलेल्या जुन्या पुस्तकांचा खजिना मला सापडला. ती पुस्तके मी अधाशासारखी वाचून काढली. त्यात आफ्रिकेच्या जंगलात केलेल्या सफरीची वर्णने होती. त्यामुळे घरबसल्या मला आफ्रिकेच्या जंगलात फिरण्याचा अनुभव घेता आला. त्या गोष्टी मी माझ्या मित्रांना सांगू लागलो. त्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वाची छाप इतरांवर पडू लागली. त्याचा परिणाम असा झाला, की माझी वाचनाची गोडी अधिकच वाढली. मी नवनवीन पुस्तकांचा शोध घेऊ लागलो. त्या काळी चांदोबा मासिक प्रसिद्ध होत असे. किंमत कमी असली तरी आर्थिक परिस्थितीमुळे ते विकत घेता येत नसे. ते काही तासांच्या बोलीवर मागून आणून वाचावे लागे. त्याचा असा फायदा झाला, की भरभर वाचण्याची सवय झाली. त्याचा फायदा पुढील जीवनात झाला. बाबुराव अर्नाळकर यांची पुस्तके खूप प्रसिद्ध होती. गुप्तहेरांच्या कथा वाचताना भीती, उत्सुकता आणि आनंद यांचा प्रत्यय येई. वाचनाची ही भूकही मागून आणलेल्या पुस्तकांवर भागवावी लागे. वाचनाची आवड असल्यामुळे शाळेतील पुस्तके अगोदरच वाचून झालेली असत. त्यानंतर मी पुढील वर्गाची पुस्तके वाचू लागलो. त्यातही मराठी आणि इतिहास ही पुस्तके आवडीची होती. माध्यमिक शिक्षणासाठी कर्जतला असताना तिथे सायंकाळी वाचनालयात जात असे. तिथेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना अभ्यासाला असलेल्या कादंबऱ्या वाचू लागलो. चि. वि. जोशी, पु. ल. देशपांडे, रणजीत देसाई, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, व. पु. काळे, संतसाहित्य, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, अण्णा भाऊ साठे आणि अनेक मराठी व इंग्रजी लेखकांचे साहित्य मी वाचले आहे. महाविद्यालयात विज्ञान विषय घेऊनही मराठी साहित्य वाचनाची आवड कायम राहिली. लेखक म्हणून व्यक्तिमत्त्व घडण्यात या वाचनाचा खूप मोठा

वाटा आहे. माझ्या लेखन प्रवासात मी लेख, कथा, कादंबरी, चरित्र लेखन, भाषांतर आणि ओवीबद्ध रचना असे विविध प्रकार हाताळले आहेत. यात वीस पुस्तके आणि पाचशेहून अधिक लेखांचा समावेश आहे. माझ्या लेखनाला मराठी साहित्य परिषद आणि इतर संस्थांची पारितोषिके प्राप्त झाली आहेत. 'ओवी गाऊ विज्ञानाची' या पुस्तकात विज्ञान ओवीबद्ध स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जगातील हा असा पहिलाच प्रयोग आहे. ज्ञानेश्वरी व गाथा यांचे वाचन केल्यामुळे हे शक्य झाले. 'धुमयान' या कादंबरीत शंभर वर्षांनंतर मंगळ ग्रहावर गेलेल्या भारतीयांना आलेल्या अनुभवांचे चित्रण व आभास आणि वास्तव यांचे मिश्रण आहे. मंगळावरचे वातावरण आणि बदल वर्णन करताना वाचनातून मिळालेल्या माहितीचाच उपयोग केला आहे. चरित्र लेखनासाठीही अशीच माहिती मिळवावी लागते. मराठीबरोबर इंग्रजी वाचनाची आवड वाढत गेली. पाचवीपासून इंग्रजी शिकण्याचा फायदा झाला. मराठी भाषेवर पकड असल्यामुळे इंग्रजी शिकणे सोपे झाले. अनेक इंग्रजी पुस्तकांचे लिखाण आणि राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी मासिकाचा सहसंपादक होणे शक्य झाले. संशोधक म्हणून काम करताना अनेक संदर्भांचे वाचन करावे लागते. नुसते वाचन करून भागत नाही, तर त्याचे आकलन करून त्याचा मथितार्थ समजून घ्यावा लागतो. हे करण्यासाठी वाचनाची आवड आणि सवय असावी लागते. वाचनाचा आनंद घ्यावा लागतो. अन्यथा वाचन हे ओझे वाटू लागते. शिकवणे ही एक कला आहे. शिकवणे रोचक करण्यासाठी विषयाच्या बाहेरची उदाहरणेही द्यावी लागतात. अशी उदाहरणे सापडणे वाचनामुळेच शक्य होते. संस्कृतमध्ये एक श्लोक आहे.

*शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः।*
*वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा।*

चांगला वक्ता हा दुर्मीळ असतो हे यावरून ध्वनित होते. चांगला वक्ता होण्यासाठी वाचनाचे पाठबळ आवश्यकच असते. माझ्या भाषणात मी छोटीछोटी उदाहरणे आणि संदर्भ देतो. त्यामुळे भाषण चांगले होते. प्रशासनात काम करताना वाचनकौशल्य उपयुक्त ठरते. अनेक प्रकरणांचा निपटारा कमी वेळात करणे आवश्यक असते. वाचनाची सवय असेल, तर भरभर वाचून मुद्दा समजून घेता येतो. कुलगुरू पदावर काम करताना मला याचा चांगला अनुभव आला. एकूणच शिक्षक, संशोधक, लेखक, प्रशासक आणि वक्ता असे व्यक्तिमत्त्वाचे अनेक प्रकार विकसित होण्यामागे वाचनाची आवड हे मुख्य कारण आहे, हे मी ठामपणे म्हणू शकतो.

माणसाचे व्यक्तिमत्त्व हे माहिती, ज्ञान, आकलन आणि विचारांवर अवलंबून असते. शारीरिक सौंदर्य, भारीभारी, कपडे या गोष्टी दुय्यम स्वरूपाच्या असतात. वाचनामुळे मेंदूच्या विकासाला चालना मिळते. केवळ शब्दांच्या साहाय्याने वातावरण निर्मिती करण्याचे आव्हान मेंदूला पेलावे लागते. यात शब्द वाचणे, अर्थ समजावून घेणे, संदर्भ शोधणे, प्रसंगाची कल्पना करणे आणि मनात भाव निर्माण करणे अशा विविध प्रक्रिया घडत असतात. यातून एक आभासी जग निर्माण होते. कल्पनाशक्तीला वाव मिळतो. मेंदूच्या क्षमता विकसित होतात. त्या अनुभवात रमल्यामुळे आनंद मिळतो. विचारांना चालना मिळते. न समजलेल्या गोष्टी समजून घेण्याची सवय लागते. टीव्हीवर प्रसंग पाहताना मेंदूला हे करावे लागत नाही. त्यामुळे विचारांना चालना कमी मिळते. वाचनामुळे मेंदू प्रगल्भ होतो, कारण त्याचा उपयोग वाढतो. पुस्तकातून सखोल ज्ञान मिळवता येते. तेवढेच ज्ञान मिळवताना इतर साधनांचा वापर केल्यास मेंदू आणि शरीरावर अतिरिक्त ताण पडतो. शिवाय ते खर्चीक असते. पुस्तक वाचण्यासाठी विशिष्ट जागा, वीज यांची आवश्यकता असतेच असे नाही.

**(पृष्ठ क्र. १२ वर)**

# साद पुस्तकांची! वाचनाच्या आनंदाची!

**प्रवीण दवणे**
भ्रमणध्वनी : ९८२०३८९४१४

वाचनाचा नेमका आनंद काय हे सुद्धा वाचनामुळेच कळते; हीच खरे तर वाचनाची गंमत आहे. आपल्याशी सूर जुळणाऱ्या आशयात मनाची समाधी लागते, ती वाचनातच. या समाधी साधनेतच मनाचा विस्तार होतो व खोलीही वाढते. खरे तर, वाचनाच्या आनंदाची ही गंमत समजावून सांगणे अवघड आहे, कारण वाचण्याचीच ज्याला ओढ नाही, ती व्यक्ती हा मजकूर तरी कशाला वाचेल!

नव्या पिढीत वाचन प्रेरणा रुजवण्याचे कार्य असे लेखन करू शकते. मला अनेक पालक विचारतात, 'सर, आमच्या मुलांना वाचण्याची गोडी लावण्यासाठी आम्ही कोठून आणि कशी सुरुवात करायची ते सांगा.' मी जे उत्तर देतो, ते ऐकून त्यांतील अनेक पालक कावरेबावरे होतात. हे असे उत्तर आपलेच प्रश्नचिन्ह करेल, असे त्यांना स्वप्नातही वाटलेले नसते. मी सांगतो, ''तुम्ही दोघे, म्हणजे आई आणि बाबा तुमच्या मुलांना वाचताना दिसा. वाचनाचा आनंद, त्यावर होणारी चर्चा, कधी नव्या मतांचे मंथन, कधी नव्या शब्दांचा किंवा नव्या संकल्पनांचा मिळणारा आनंद तुमच्या चेहऱ्यावर त्यांना अनुभवू द्या. म्हणजे तुमची मुलेही वाचू लागतील.''

> *आजकालची मुले वाचत नाहीत. मोबाईलमध्ये डोके खुपसून बसलेली दिसतात. समाजमाध्यमांत गुंतून पडलेल्या मुलांना त्यापासून परावृत्त कसे करायचे, ही मोठी समस्या आहे. हा प्रश्न अनेक पालकांना पडलेला असतो. मुलांना वाचनप्रवृत्त कसे करायचे याचे उत्तर देताना लेखक सांगतात, की आई–वडील या दोघांनी स्वतःपासून सुरुवात करावी आणि स्वतः वाचन करत मुलांसमोर स्वतःचा आदर्श ठेवावा हाच उत्तम मार्ग आहे.*

आता अशा उपायात जबाबदारी आली. आपली जबाबदारी टाळून केवळ उपदेश करणे, ही जगातील सर्वांत सोपी गोष्ट आहे. पालक असो अथवा शिक्षक; वाचनानंदात बुडलेला दिसला, की विद्यार्थ्यांना आपोआप कुतूहल वाटते. काय बुवा ही पुस्तकात गढलेली असतात! आपणही चार पाने चाळावीत; मग चार पानांची चारशे पाने कधी होतात ते कळतही नाही. आज पालकपिढी जागेपणातील तीन चतुर्थांश वेळ मोबाईलमध्ये डोके खुपसून बसलेली दिसते; आणि पुन्हा आपल्या मुलांनी मात्र मोबाईलचा वापर मर्यादित करावा, अशी अपेक्षा करते; ही अपेक्षाच मोठी गमतीदार आहे. पालकरूपातील शिक्षक असो, की शिक्षकरूपातील पालक असो, आपल्या उच्चारामागे आचार असला, की आपले शब्द उजळतात. जसे – केवळ वातीने दिवा उजळत नाही; ती वात तेलात भिजलेली हवी ना! आपले शब्द हे आचारात, विचारात भिजलेले हवेत. नवी पिढी वाचनाधिष्ठित होण्यासाठी आधीच्या पिढीने अथांग वाचनाच्या डोहात स्वतःला बुडवून घ्यायला हवे.

साक्षरतेमुळे आपण जे शब्द 'वाचतो', ते म्हणजे 'वाचन' नव्हे असे मला वाटते. शब्दांच्या सोबतीने शब्दांच्या पलीकडे जाता येणे म्हणजे 'वाचन', असे आपले मला वाटते. लेखक किंवा कवी जे लिहितो; त्या पलीकडले त्याला वेगळे काही सांगायचे असते, म्हणून अक्षर वाचनापासून जरी वाचनाची सुरुवात झाली, तरी वाचनातील अक्षर आशयाकडे वाचकाचा प्रवास सुरू व्हायला हवा. अलीकडे वाचनाची ही अक्षरांच्या पलीकडे नेण्याची विराट शक्तीच ध्यानात घेतली जात नाही. परिणामतः विनोद, कारुण्य, जीवनचिंतन, लालित्य, गद्यातील 'काव्य' याचा आनंद आपण हरवत चाललो आहोत. वाचनातील खुमासदारी ध्यानात न घेता काही वेळा शब्दांना 'शब्दशः' घेतले जाते; त्यातून वेगळेच, अपेक्षित नसलेले समज निर्माण होतात. लेखक व कवी कपाळावर हात मारून मटकन खालीच बसतात. 'अरे, मला तर हे अजिबातच म्हणायचे नव्हते!' असे प्रमाण वाढले, की मग वाचकाची समज लक्षात घेऊन लेखकही सरळसोट लिहू लागतात. सूचकता, प्रतिकात्मकता यांतील 'साहित्य' हरवून ढोबळ, बटबटीत लेखन जन्माला येते... म्हणून वाचनानंदाबद्दल व्यक्त होताना मी हेही सांगेन, की कसदार लेखननिर्मितीसाठी वाचकानेही आपला वाचक म्हणून कस वाढवायला हवा.

वर्गातील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात शिक्षकांचा सर्वांत मोठा वाटा आहे. भाषा विषयाच्याच नव्हे, तर सर्वच विषयांच्या शिक्षकांचा. आपली अशी एक समजूत असते, की फक्त मराठी विषयाच्याच शिक्षकांनी पुस्तकांबद्दल बोलावे, पण अगदीच वेडगळ समजूत आहे ही! एखाद्या मोकळ्या तासिकेला विज्ञानाच्या शिक्षिकासुद्धा जयंत नारळीकर यांच्या विज्ञान कथा वाचून दाखवू शकतात. कधी भूगोलाचे शिक्षकही द. मा. मिरासदारांची खुमासदार कथा वाचू शकतात; तर इतिहासाचे शिक्षकही बालकवींची 'फुलराणी' सादर करू शकतात; पण आपल्याकडे शिकवण्याचे विषय तेच आपले विषय असे मानले जाते. इतरांमध्येही वाचनाची गोडी व सादरीकरणाची कला असू शकते. शाळेत उत्तम वाचनाचे सुबुद्ध पर्यावरण असणे गरजेचे आहे. मुलांच्या वाढदिवसाला केवळ 'एक पुस्तक' पालकांनी शाळेला भेट म्हणून दिले तरी दोन–तीन वर्षांत हजार पुस्तके शाळेच्या ग्रंथालयात जमा होतील; मात्र ती मुलांना वाचण्यास खुली करणे आवश्यक आहे; पण त्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक काहीसे प्रयोगशील असणे आवश्यक आहे.

कवितेचे वाचन हा स्वतंत्रच विषय आहे. थोडक्यात असे सांगेन, की कविता छंदबद्ध असो वा छंदमुक्त; तिला एक अंगभूत लय असते. ती जर वाचक शिक्षकाला उमजली आणि तसे सादरीकरण केले, तर मुले त्या कवितेचा आनंद घेऊ शकतात. सपक व रटाळ वाचनाने कुपीतील अत्तर झाकण न उघडता आल्याने, फक्त कुपीच्या वरच्या काचेलाच नाक लावावे लागून समाधान मानल्याप्रमाणे कवितेचा सुगंधच आपण नव्या पिढीला देऊ शकत नाही.

वाचनाचा आनंद हा कसदार जीवन जगू इच्छिणाऱ्या प्रत्येकाच्या आयुष्यातील श्रेष्ठ आनंद आहे. हो, पण त्यासाठी पुस्तकांची साद ऐकू यायला हवी आणि ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवायलाही हवी!

■■■

# वाचन संस्कृती जोपासण्यासाठी...

**अजित राक्षे**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहाट,
ता. जावळी, जि. सातारा
भ्रमणध्वनी : ९४०४६२९३७२

*वाचनाने माणसाची वैचारिक समृद्धी वाढते. सध्याच्या काळात टीव्ही आणि इंटरनेटचे, मोबाईलचे एवढे आकर्षण वाढले आहे, की त्यामुळे वाचनाकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे असे वाटत असले, तरी तरुण मुलांमध्ये 'ई-बुक' वाचण्याची सवय दिसून येत आहे आणि तिचे आवडीत रूपांतर झाले, तर वाचन संस्कृती जोपासण्यासाठी मदत होऊ शकते. यासाठी सकारात्मक प्रयत्नांची गरज आहे, हे स्पष्ट करणारा लेख.*

मागल्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झाले आहे, वाचनाची आवड कमी झाली आहे अशी तक्रार सर्वच स्तरांमधून वाढते आहे. वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी, वाढविण्यासाठी शालेय वयातच वाचनाची गोडी लावण्याकरिता प्रयत्न करायला हवेत. वाचनाची आवड मुळातूनच निर्माण होणे आवश्यक आहे. तसे झाले तरच वाचन संस्कृतीत वाढ होईल आणि पर्यायाने उत्तम युवापिढी घडण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

'वाचाल तर वाचाल' ही उक्ती अगदी समर्पक आहे, हे आपण सर्वच जाणतो; परंतु आजच्या विद्यार्थ्यांना याचे महत्त्व कळण्यासाठी हा लेखनप्रपंच.

विद्यार्थ्यांना वाचनाचे वेड लावायचे असेल, तर तशी परिस्थिती त्यांच्याभोवती निर्माण होणे गरजेचे आहे. वाचनाने माणूस प्रगल्भ होत असतो. जितके वाचन कराल तेवढे ज्ञान वाढत जाईल. ग्रंथ हे गुरू आहेत. अलीकडच्या काळात इंटरनेटमुळे आपल्या मोबाईलवर जगातील कानाकोपऱ्यांत घडणाऱ्या घटनांची अद्ययावत माहिती प्राप्त होते. आज वाचनासाठी अनेक उत्तम साधने हातात उपलब्ध असूनही तरुण पिढी वाचनापासून दूर जात आहे. ती मोबाईलच्या आहारी जाऊन इंटरनेटवर वेळ घालवत असल्याचे चित्र आज दिसत आहे. त्यांना वाचनासाठी वेळ उपलब्ध नसतो, असे कारण सांगितले जाते. परिस्थिती कशीही असली तरी वाचनाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांना वाचनाचे महत्त्व कळावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

लोकमान्य टिळकांनी, 'तुम्हांला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल, तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल, तर वाचनाशिवाय पर्याय नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या दुनियेत गुंतल्यामुळे त्यांच्या उपदेशाकडे नव्या पिढीचे लक्ष नाही. सखोल विचारातूनच एकरूप समाजाची निर्मिती होत असते आणि सखोल विचार करण्याची सवय चांगल्या वाचनातूनच तयार होते.

वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा महत्त्वाचा वाटा असतो. जगण्याच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे. ज्ञानात सतत वाढ करण्यासाठी वाचन हा एकमेव मार्ग आहे. यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन

समृद्ध करा. लहानांपासून मोठ्यांपर्यंत पुस्तके हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय व्हायला हवा. पूर्वी पुस्तक मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे वाचनालय असे. विविध विषयांची चांगली पुस्तके आपल्याला जगण्याची नवी दिशा दाखवतात.

आज त्या वाचनालयांची जागा इंटरनेट आणि ई-बुकने घेतली आहे. ऑनलाईन साईट्समुळे विविध विषयांवरील पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

पुस्तके आपल्याला सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करतात. पुस्तकांमधील समृद्ध विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तक हे केवळ शब्दसंपदा वाढवण्यास मदत करणारे साधन नसून, पुस्तक हे अनुभवांसह कल्पनांचे, आशा-आकांक्षाचे क्षितिज निर्माण करणारे साधन आहे. पुस्तकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटले पाहिजे.

एकदा वाचनाची सवय लागली, की माणूस मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रममाण होऊन जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो. निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस त्यातून बाहेर येऊ शकतो. आजकाल विद्यार्थ्यांना खूप ताण असतो. त्या अनुषंगाने ताण कमी करण्यासाठी वाचन त्यांना मदत करू शकते.

वाचन संस्कृती जपण्याशिवाय पर्याय नाही. वाचनामुळे माणूस प्रगल्भ होतो. नियमित वाचन केले, तरच भावी पिढी सक्षम व सुजाण होईल. तरुण पिढीने पुस्तक वाचन हा छंद जोपासला पाहिजे. साक्षर विद्यार्थ्यांपैकी ६१ टक्के विद्यार्थी, त्यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत समाधानी आहेत. मात्र वाचनाचा छंद असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे प्रमाण ७० टक्के, तर कमी वाचन करणाऱ्यांमध्ये हेच प्रमाण ५८ टक्के आहे.

वाचन समृद्ध असले म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबल होते, कल्पनाशक्तीला वाव मिळतो, रसिकता वाढीस लागते, सर्जनशीलतेला वाट सापडते आणि सहृदयता, दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव व ती समजून घेण्यासाठी आवश्यक असणारे संवेदनशील मन यांस खतपाणी मिळते. इतरांबाबत, समाजाबाबत, आपली काही कर्तव्ये आहेत याची जाणीव होते.

मन संकुचित, क्षुद्र गोष्टींत अडकत नाही. वाचनामुळे माणसाला माणूस म्हणून असलेल्या त्याच्या अस्तित्वाचे मोल किती अनमोल आहे, याची जाणीव झाल्याशिवाय रहात नाही. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करत आपण वाचन संस्कृतीविषयी जनजागृती केली. पुस्तकांविषयी कायमची ओढ विद्यार्थ्यांच्याही मनात निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

एकविसाव्या शतकात मानवाने औद्योगिक क्रांती बरोबरच इंटरनेटचा वापर करून संपूर्ण विश्व आपल्या कवेत ओढून घेतले आहे. अगदी वाखाणण्याजोगी प्रगती मानवाने केली आहे. परंतु म्हणतात ना, प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. अगदी तसेच आपल्या डोळ्यांना सुखावणाऱ्या प्रगतीच्या पाठीमागे अंधाराची छाया आहे, ज्यामुळे आपण बऱ्याच गोष्टी गमावत आहोत आणि त्यातीलच एक मुख्य असणारी गोष्ट म्हणजे वाचन संस्कृती होय.

आपल्या सर्वांच्या परिचयात अशी खूप लहान मुले असतील, जी मोबाईल किंवा टीव्ही बघत बघतच जेवतात. आजकाल पालक आपल्या मुलांना एका जागी शांत बसवून ठेवण्यासाठी मोबाईल देताना दिसतात. अशा वेळी तेवढी वेळ भागून जातेही; परंतु याचा दूरगामी

वाईट परिणाम आपणच आपल्या मुलांच्या जीवनावर करत आहोत, याचा तिळमात्र अंदाज पालकांना नसतो. त्याऐवजी विविध रंगांची, आकारांची लहान पुस्तके जर पालकांनी आपल्या पाल्याला हाताळायला दिली, तर त्यांच्यात जिज्ञासा जागृत होईल. वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांची मानसिक वाढ चांगल्या पद्धतीने होईल. बडबडगीते, बोधपर कथा, प्राणी, पक्षी, फुले, फळे यांची माहितीपर पुस्तके, तसेच चित्रमय गोष्टींची पुस्तके, संस्कारगीते यांचा समावेश असलेले साहित्य वाचण्याची सवय जाणीवपूर्वक मुलांना लावली आणि मुलांमध्ये कुतूहल जागृत केले, तर मुलांची विचार करण्याची क्षमता वाढीस लागेल, एकाग्रता वाढेल. याकरता मुलांना वरचेवर भेट म्हणून खेळण्यांऐवजी पुस्तके देऊन त्यांना वाचनाची गोडी लागेल या दिशेने सतत प्रयत्न व्हायला हवे. तासन्तास स्क्रीनसमोर असल्याने आजकाल लहान मुलांमध्ये चष्मा लागण्याचे प्रमाणदेखील वाढले आहे. यामुळे मुलांच्या दृष्टीवर आयुष्यभरासाठी परिणाम होतोच आणि त्यांच्या विचारांवर होणाऱ्या परिणामाला तर उपायच नाही, उलट मुलांमध्ये नैराश्य, निष्क्रियता, चिडचिडेपणा वाढीस लागतो आणि या सर्व व्याधींवर एकच उपाय तो म्हणजे वाचन.

एखाद्या गोष्टीची मुलाला एकदा आवड निर्माण झाली, की ती कायम स्वरूपात टिकून राहते. अगदी साध्या साध्या सवयी आहेत; ज्यामार्फत आपण आपल्या मुलांच्या मनात वाचनाची आवड निर्माण करून वाचन संस्कृती जतन करण्यास हातभार लावू शकतो. उदा., वाढदिवसानिमित्त शाळेत चॉकलेट्स न वाटता शाळेला दोन पुस्तके भेट म्हणून द्यावीत, जेणेकरून शाळेचे वाचनालयही समृद्ध होईल. घरातही छोटेखानी वाचनालय असावे, ज्यात मुलांच्या आवडीची पुस्तके असावीत. खरे तर वाचनाची आवड मुले शाळेत दाखल होण्यापूर्वी घरापासूनच लागायला हवी. खेळणी, खाऊ, कपडे खरेदी करताना आवर्जून एखादे पुस्तकही घेतले पाहिजे. एखादे पुस्तक मुलाच्या आयुष्यात टर्निंग पॉइंट ठरू शकेल.

मोबाईलच्या अतिवापराने अलीकडे मुले उशिरा बोलायला लागली आहेत, तर काही मुले वयाच्या सहा-सात वर्षांपर्यंत बोबडे बोलताना दिसून येत आहेत.

पूर्वी घरात संस्कृत श्लोकांचे वाचन-पठण करायला लावत असल्याने लहान वयातच मुलांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध होत असत. मुले ही अनुकरणप्रिय असतात, हे तर आपणा सर्वांना ज्ञात आहेच. त्यामुळे वाचन संस्कृती आपल्या घरापासून वाढीस लावण्यासाठी पालकांनी प्राधान्याने पुढाकार घेतला पाहिजे. जर पालकच हातात मोबाईल घेऊन व्यस्त राहणारे असतील, तर त्यांची मुले त्यांचेच अनुकरण करतील, हे अवश्य लक्षात घ्यावे.

ज्याप्रमाणे आजारी पडल्यावर औषध कितीही कडू असले, तरी तंदुरुस्त होण्यासाठी आपण ते घेतो त्याचप्रमाणे मनाचे आरोग्य निरोगी व तंदुरुस्त, अबाधित राखण्यासाठी वाचन करणे खूप गरजेचे आहे.

असे म्हणतात, की पुस्तक हा माणसाचा खूप जवळचा मित्र आहे. जिथे वाचन आहे, तिथे प्रगती आहे; कारण वाचनानेच माणूस समृद्ध होतो. आपल्या ध्येयाच्या दिशेने मार्गक्रमण करतो. वाचनाने आपले अनुभवविश्व, भावविश्व संपन्न होते. पुस्तक कोणतेही असो ते आपल्याला ज्ञान मिळवून देते. चांगल्या-वाईटाची जाण करून देते; परंतु पुस्तक वाचायला घेतले की, झोप येते असा बऱ्याच लोकांचा समज असतो. अशा लोकांनी एक प्रयोग करून बघायला हरकत नाही. या प्रयोगाच्या प्राथमिक अवस्थेत खूप जड, कठीण शब्दांची, खूप वैचारिक अथवा दुःखद भावनांनी ओतप्रोत अशा साहित्यकृती वाचण्याऐवजी आरंभी, हलके-फुलके, मनाला आनंद देणारे, मनोरंजक साहित्य वाचण्यासाठी घ्यावे आणि मुख्य म्हणजे प्रत्येक

साहित्याचा मनापासून आस्वाद घ्यावा. एक पान वाचत असताना पुढच्या पानावर काय असेल, अशी उत्कंठा वाचकाच्या मनात उत्पन्न करणाऱ्या साहित्यकृती प्रथम वाचाव्यात.

वाचनाची बदलती माध्यमे सध्या संक्रमण अवस्थेत आहेत. छापील माध्यमांचा डिजिटल माध्यमांच्या दिशेने प्रवास सुरू आहे. सध्याचे युग हे डिजिटल युग आहे, त्यामुळे काळानुरूप बदलणाऱ्या वाचनाच्या माध्यमांचा आपण स्वीकार केला पाहिजे. तथापि, नवे कोरे-करकरीत पुस्तक उघडून वाचण्याचा जो काही अत्युच्च आनंद आहे, त्याची तुलना कशाशीही होणार नाही आणि हा अनुभव प्रत्येकानेच आपल्या आयुष्यात वरचेवर घ्यावा आणि वाचन संस्कृतीच्या जतनात खारीचा वाटा उचलावा.

■■■

**(पृष्ठ क्र. ६ वरून)**

पुस्तक तुम्ही हवे तेव्हा आणि सवडीप्रमाणे वाचू शकता. पुस्तक हे चांगला मित्र, मार्गदर्शक आणि गुरू बनू शकते. आवडलेल्या पुस्तकाचा हवा तसा आस्वाद पुनःपुन्हा घेता येतो. एकविसाव्या शतकात आपण ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती करू पाहत आहोत. हे करत असताना अनेक आव्हांनाना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची गरज भासणार आहे. बदलणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याकरता आवश्यक असे व्यक्तिमत्त्व तयार होण्यासाठी वाचन हा पाया आहे. नवे ज्ञान आणि तंत्रज्ञान निर्माण होत असताना त्याचे आकलन करून त्याचे उपयोजन करणे विकासासाठी अपरिहार्य ठरणार आहे. विकसनशील देशांमधील युवकांना हे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवांतून मिळणे शक्य होणार नाही. अशा परिस्थितीत ते पुस्तकांद्वारे मिळवावे लागेल. त्यासाठी वाचन संस्कृती जपणे आणि वाढवणे जरुरीचे आहे.

■■■

## एप्रिल-मे २०२३ अंकातील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | म | न | ध | र | णी | |
| (२) | स | हा | रा | | | |
| (३) | रा | व | ब | हा | द्दू | र |
| (४) | उ | ष्ट्र | | | | |
| (५) | मा | ल | कं | स | | |
| (६) | झं | झा | वा | त | | |
| (७) | त | रं | ग | | | |
| (८) | मा | र्जा | र | | | |
| (९) | म | नो | वे | ध | क | |
| (१०) | ऊ | हा | पो | ह | | |
| (११) | का | रा | गृ | ह | | |
| (१२) | धृ | त | रा | ष्ट्र | | |
| (१३) | उ | मा | प | ती | | |
| (१४) | झा | ल | | | | |

म हा रा ष्ट्र मा झा ग र्जा म हा रा ष्ट्र मा झा

# वाचन - एक प्रेरणा स्रोत

**विद्या दामोदरे**
जि. प. उच्च प्राथमिक शाळा नायगाव,
ता. अचलपूर जि. अमरावती.
भ्रमणध्वनी : ७३८७९८३१११

एकविसावे शतक हे आधुनिक तंत्रज्ञानाचे, इंटरनेटचे समजले जाते. इंटरनेटवर प्रचंड माहिती उपलब्ध आहे. ज्यांना वाचनाची आवड नाही, ते या माहितीपासून दूर असतात, परिणामी त्यांची प्रगती मंदावते. आजच्या स्पर्धेच्या युगात आपल्याला नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. उदा., आपली नोकरी असो, की उद्योग-व्यवसाय असो; यामध्ये आपल्यासमोर प्रचंड स्पर्धा असते. नोकरीत पदोन्नती (बढती) मिळविण्यासाठी स्पर्धा परीक्षा, विभागीय परीक्षा देणे क्रमप्राप्त, बंधनकारक असते. त्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. वाचनाने आपल्याला ज्ञानप्राप्ती होत असल्यामुळे आपल्या क्षेत्रामध्ये आपण यश संपादन करू शकतो. वाचनामुळे आपली ज्ञानाची आस कायम राहते.

> *वाचनाने संवाद साधण्याची कला विकसित होते. वाचनाने आपण कोणाशीही संवाद साधू शकतो. शिक्षण अधिक आनंददायी करण्यासाठी वाचनप्रेरणा महत्त्वाची भूमिका बजावते. वाचनाने शिक्षणाचे वर्तमान मार्ग पुस्तकात मिळतात. ज्ञानप्राप्तीसाठी वाचन महत्त्वाचे आहे.*

'दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे' असे समर्थ रामदास स्वामी यांनी म्हटले आहे. आजच्या तंत्रज्ञान व स्पर्धेच्या युगात ज्ञानार्जन करणे हे अत्यावश्यक आहे. यशस्वी जीवनासाठी वाचन अपरिहार्य आहे. संत ज्ञानेश्वरांनीसुद्‌धा लिहिले आहे, 'अज्ञानाच्या तिमिराशी ग्रंथ हेच दीपस्तंभ'. ज्ञानप्राप्ती आणि कौशल्यासाठी वाचन हा प्रेरणास्रोत आहे. अनेक लोक सांगतात, की आम्ही घडलो ते वाचनामुळे, म्हणूनच मनोरंजनाची विविध माध्यमे उपलब्ध असतानासुद्‌धा पुस्तकांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. शिक्षणाची दृष्टी किती व्यापक आहे, याविषयी अनुभवाच्या गोष्टी पुस्तकातून वाचल्या, की शिक्षणाची दिशा व प्रवास कोणत्या मार्गाने करायचा याचा शोध घेण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना मदत होते; कारण कर्तृत्ववान चांगले आयुष्य जगणाऱ्या माणसांच्या गोष्टी पुस्तकात वाचायला मिळतात. शून्यातून विश्व निर्माण करणारी ही माणसे आकाशाच्या उघड्या शाळेत शिकली. ती थोर माणसे वर्तमानातील गुणांच्या स्पर्धेत पुढे नसतील; पण त्यांनी जीवनाच्या शिखरावर मात्र उंच भरारी घेतली.

भारतरत्न डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, नेताजी सुभाषचंद्र बोस, एन. आर. नारायण मूर्ती, वि. दा. सावरकर, साने गुरुजी यांसारख्या अनेक थोर विद्‌वान लोकांच्या जीवनाच्या जडणघडणीचा प्रवास, अनुभवाचे बोल वाचले, की आपणाला सहज प्रेरणा मिळते. वाचनाने ऊर्जा प्राप्त होते, असे म्हणत असलेल्या शिक्षणाचा अर्थ सहज समजतो व दृष्टी विशाल, व्यापक करणारे अनुभव पुस्तकातून मिळतात.

वाचन नियमित व भरपूर असल्यास वाचनाचा वेग सहज वाढत जातो आणि वेग वाढविल्यास खूप वाचन होते. विषय सहज समजतो व आवश्यक तेवढे ज्ञान मिळवता

येते. ज्यांचे वाचन कमी असते त्यांची प्रगती खुंटते. त्यांची आकलन क्षमता कमी होते व त्यांना कोणत्याही परीक्षेत फारसे यश मिळत नाही. नियमित वाचनाने मनाची एकाग्रता वाढते. फक्त अभ्यासापुरतेच वाचन आवश्यक आहे असे नाही, तर आयुष्यभर वाचन आवश्यक आहे. वाचनाने संवाद साधता येतो. वाचनाने निखळ आनंद मिळतो. पुस्तके वाचताना वास्तव अनुभव कळतात. शौर्यगाथा वाचताना स्फुरण येते. अशा पराक्रमी गाथा माणसाला आत्मभान व बळ देतात.

वाचनाने दृष्टिकोन किती विशाल, व्यापक होतो हे पुस्तक वाचले, की विद्यार्थी, शिक्षक व पालकांना समजायला लागते. महान माणसांचा जीवनप्रवास उलगडणारे पुस्तक आपल्याला वाचायला मिळाल्यास त्या विभूतींची अनुभूती समजून घेण्याची दृष्टी, संधी प्राप्त होते. वाचन हे मनुष्याच्या ज्ञानाचा, मनोरंजनाचा, कौशल्याचा प्रमुख प्रेरणास्रोत आहे. जीवन जगताना आपल्या असंख्य गरजा पूर्ण करायला वाचनाची फार मदत होते. ध्येय गाठण्यासाठी, नोकरी मिळविण्यासाठी, मनाची शक्ती, एकाग्रता वाढविण्यासाठी, संवाद-संभाषण करण्यासाठी, शिष्टाचार शिकण्यासाठी, चालू शैक्षणिक घडामोडी जाणण्यासाठी, सत्य, असत्य जाणून घेण्यासाठी व मनःशांतीसाठीही वाचनाचा साधन म्हणून उपयोग करू शकतो. जगातील ८० टक्के ज्ञान माणसाला पुस्तकातून प्राप्त होते. वाचावे पण डोळसपणे वाचावे, वाचनाला वयाचे बंधन, अट घालू नये. वाचनाने धाडस येते, धारिष्ट्य वाढते, अवगुण निघून चांगले गुण आत्मसात होतात. वाचनातून जीवन जगण्याची कला साध्य होते.

त्यासाठी वाचन संस्कृती वाढली पाहिजे, कारण मनुष्याच्या जडणघडणीवर परिणाम करणारे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन होय. वाचनालये ही प्रेरणास्रोत आहेत. विद्यार्थी व पालकांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी ग्रंथालयांमधील व वाचनालयांमधील मासिके, साप्ताहिके, दिवाळी अंक यांच्या माध्यमातून मदत होऊ शकते व त्यातूनच त्यांना दिशा मिळू शकते. स्पर्धा परीक्षेत व इतर नोकरी, व्यवसाय, उद्योगात यश मिळवून आपले उज्ज्वल भविष्य घडवून आपल्या घराचे, आपल्या गावाचे, परिसराचे नाव यशस्वितेच्या शिखरावर नेणारे लोक आपले स्वतःचे अनुभव सांगताना म्हणतात, की मी घडलो ते फक्त वाचनामुळे. आज अनेक विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास, मूल्यशिक्षण, थोर समाजसुधारक यांची चरित्रे, आत्मचरित्रे इत्यादी स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे वाचन करून आपले सोनेरी भविष्य उज्ज्वल करत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणक, इंटरनेट, विज्ञान इत्यादी विषयांच्या पुस्तकांच्या वाचनाने मिळणारे ज्ञान यशस्वी जीवन जगण्याचे स्वप्न पूर्ण करते.

वाचन वाढले म्हणजे साक्षरता वाढली असे म्हणतात, कारण ज्ञानाचे क्षेत्र फार मोठे आहे. यापूर्वीसुद्धा शासनाने 'प्रौढ शिक्षण' अभियान राबवले. याचा उद्देश सर्वांना लिहिता-वाचता यावे व लोकांना आनंदाने व समाधानाने जीवन जगता यावे असाच होता. देशामध्ये जी शैक्षणिक क्रांती झाली तीसुद्धा ग्रंथांमुळेच. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''ग्रंथ हे गुरू आहेत, वाचन हा माझा श्वासोच्छ्वास आहे.'' स्पर्धेच्या व माहितीच्या युगात वाचन संस्कृती ही अभ्यास व मनोरंजनापुरती मर्यादित न ठेवता, आपली सर्वांची गरज होणे महत्त्वाचे आहे. तरुणांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल व उज्ज्वल भविष्य घडवायचे असेल, तर वाचनाशिवाय पर्याय नाही.

■■■

# New Dimensions of Reading Skills

**Dr. Deepak Gund**
Shankarrao Nimbalkar
Adhyapak Vidyalay, Barshi,
Dist. Solapur
Mobile : 9822554215

**New Dimensions of Reading Skills :** Introduction Language is a skill subject. Learning any language means learning the basic skills of the particular language. These skills are to be acquired gradually. It requires sufficient mastery or command. It requires practice. The basics skills of language are listening, speaking, reading and writing. Out of these skills, listening and reading are referred as passive or receptive skills while speaking and writing skills are active skills. The mastery over Reading Skills is very important in the present era. Here is an attempt to introduce the concept, characteristics, types, importance and techniques for developing Reading Skills.

> *This articles aims to develop understanding about the entire reading process. It includs pedagogical concerns of reading and understanding English. It elaborates types of reading with examples.*

**Concept of Reading skills :** Reading skills are abilities that pertain to a person's capacity to read, comprehend, interpret and decode written language and texts. Reading is a process of the brain where you look at symbols on a page, and your mind sees the patterns of characters and understands the meaning in them. Reading is hard for some people and it can take time. For this, one should prepare for reading. Pick books depending on your reading level, no matter what your age. Reading is about enjoying the experience. Read the page carefully. Don't rush, but take your time. Reading skill is passive and receptive. Reading leads to comprehension. Loud reading is a sensory perception. Reading leads to activation of knowledge. Good skill of reading can inspire for writing. Repeated reading helps in developing memory.

**Process of Reading :** Reading is a process whereby a reader brings meaning to and gets meaning from print. This implies that readers bring their experiences as well as their emotions into play in order to derive meaning from text. Reading for meaning is the activity we normally engage in when we read books, journals, newspapers etc. It involves looking at sentences in a text and understanding the message they convey, in other words, making pause of a written text. Reading is thus an active process. When we read, we do not merely sit as passive receivers of the text. We also draw or help us guess what the text will pay next. Thus reading may be defined as a multifaceted and layered process in which a reader by actively interacting with the text tries to decide what has been encoded by the writer/author. In this process the learner establishes a meaningful communication with the writer. Thus, reading is an interactive process. It is purposeful, selective and text based. The reading speed varies according to one's purpose in reading and the content of the text. It involves

complex cognitive skills. Someone has called it a 'psycho linguistic guessing game' as it involves guessing, inferring and predicting the coming events based on the given situation.

Objectives of Teaching Reading Skills- The following are the objectives of teaching reading skills for a learner.

### To enable the learner

(1) To read with accuracy.
(2) To read with correct pronunciation.
(3) To read with fluency.
(4) To read with understanding.
(5) To take pleasure in reading.
(6) To use ideas gained from reading in other situations.
(7) To form a habit of reading.

### Types of reading

**(1) Skimming :** Skimming is a reading technique that uses rapid eye movement and keywords to move quickly through text for slightly different purposes. Skimming is reading rapidly in order to get a general overview of the material. Skimming is like snorkelling, telling you what general information is within a section. Skimming can save you hours of laborious reading.

**(2) Scanning :** Scanning uses keywords and organisational cues. But while the goal of skimming is a bird's-eye view of the material, the goal of scanning is to locate and swoop down on particular facts. Facts may be buried within long text relatively that have relatively little else to do with your topic. Skim this material first to decide if it is likely to contain the facts you need. Don't forget to scan table of contents, summaries, indexes, heading and typographical cues. To make sense of lists and tables, skim them first. If after skimming you decide the material will be useful, go ahead and scan.

**(3) Intensive Reading :** You need to have your aims clear in mind when undertaking intensive reading. This is going to be far more consuming than skimming or scanning. If you need to list the chronology of events in a long passage, you will read it intensively. This type of reading is indeed beneficial to language learners as it helps them understand vocabulary by deducing the meaning of words in context. It moreover, helps with retention of information for long periods of time and knowledge resulting from intensive reading persists in your long term memory. This is one reason why reading huge amounts of information just before an exam does not work very well. When students do this, they undertake neither type of reading process effectively, especially neglecting intensive reading. They may remember the answers in an exam but will likely forget everything soon afterwards.

**(4) Extensive Reading :** Extensive Reading involves reading for pleasure. There is an element of enjoyment in extensive reading it is unlikely that students will undertake extensive reading of a text they do not like. It also requires a fluid decoding and assimilation of the text and content in front of you. If the text is difficult and you stop every few minutes to figure out what is being said or to look up new words in the dictionary, you are breaking your concentration and diverting your thoughts.

**(5) Loud and Silent Reading :** Our daily reading is done silently because we are engaged in the process of deriving meaning from the passage. But when we read aloud, our concentration is divided between reading

and speaking. This makes reading difficult and may cause problems in understanding the matter. But there is something like notices and circulars which have to be read out loudly to students or employees to avoid confusion. In every other situation, silent reading is ideal because it helps in understanding things better. It is that the word loudly or audible to audience. It is also referred as mental reading.

**Strategies for Developing Reading Skills:** A strategy is a plan developed by a reader to assist in comprehending and thinking about texts, when reading the words alone does not gives the reader a sense of the meaning of a text. There are seven strategies to develop reading skills :

**(1) Make connections between new and known information** : In many classrooms, this instruction is divided into three categories of connection as-text-to-self, text-to-text and text-to-world.

**(2) Questioning :** The readers are always asking questions which they read. Sticky notes have become ubiquitous in classrooms in part because they are such a useful tool for teaching students to stop, mark text and note questions as they read.

**(3) Drawing inferences :** The readers use their prior knowledge about what might happen next. When teachers demonstrate their reading processes for students through think-aloud, they often stop and predict what will happen next to show how inferring is essential for comprehending texts.

**(4) Stating importance :** In the sea of words, readers must continually sort through and priorities information. Teachers often assist readers in analysing everything for text features in nonfiction text like bullets and heading to verbal cues in novels. Looking for these clues can help readers sift through the relative value of different bits of information in texts.

**(5) Creating mental images :** The readers are constantly creating mind pictures as they read, visualizing action, characters or themes. Teachers use picture books with students of all ages, not necessarily because they are easy to read, but because the lush and sophisticated art in these books can be a great bridge for helping students sees how words and images connect in meaning making.

**(6) Repairing understanding :** The readers don't just plow ahead through text when it doesn't make sense-they stop and use 'fix-up' strategies to restore their understanding. One of the most important fix-up tools is re-reading, write teachers demonstrating to students a variety of ways to re-read text in order to repair meaning.

**(7) Synthesizing information :** Synthesis is the most sophisticated of the comprehension strategies, combining elements of connecting, questioning and inferring. With this strategy, students move from making meaning to the text, to integrating then new understanding into their lives and world view.

**Methods of Teaching Reading Skill :** There are different methods of Teaching Reading.

**(1) Alphabetic Method :** It is also known as ABC Method or Spelling Method. It is conducted through identifying the letters, repeating the letters, combining the letters into words, combining words into sentences, Reading passages etc.

**(2) Word Method :** It is also known as Look and Say Method. It is conducted through

(पृष्ठ क्र. २५ वर)

# वाचनाचे जीवनातील महत्त्व

**कामिनी पवार**
जिल्हा परिषद शाळा, वावी
ता. धडगांव, जि. नंदुरबार.

*वाचनाने माणूस संस्कारित होतो, तसेच एकाग्रता वाढते, कल्पनाशक्ती वाढते, ज्ञान मिळते आणि माणसाचे एकाकीपण नाहीसे होते . असे वाचनाचे विविध फायदे या लेखात सांगितले आहेत. मात्र त्यासाठी नियमित वाचन केले पाहिजे. वाचन संस्कृतीचे फायदे सांगणारा हा लेख.*

वाचन ही एक अशी सवय आहे, जी आपल्याला एक प्रगल्भ व्यक्ती बनवू शकते. चांगले आणि यशस्वी जीवन जगण्यासाठी अनेक महान लोक वाचनाची शिफारस करतात. वाचनामुळे आपल्याला ज्ञान, प्रेरणा आणि मार्ग मिळतात. एखाद्या पुस्तकाच्या वाचनातून, त्यातील पात्रापासून प्रेरित होऊन आपले जीवन यशाच्या शिखरावर घेऊन गेलेले अनेक लोक आपणांस पाहावयास मिळतात. वाचनामुळे आपल्या मनात नवीन विचार, कल्पना येतात; ज्यामुळे आपल्याला पुढे जाण्यास मदत होते. आयुष्यात अनेक वेळा योग्य असे निर्णय घेण्यास वाचनाची खूप मदत होते.

वाचनाची सवय आपले ज्ञान व शब्दसंग्रह वाढविण्याचे आणि कल्पनाशक्ती विकसित करण्याचे प्रभावी काम करते. वाचनाचा सर्वांत प्रमुख फायदा आहे ज्ञानसंवर्धन. विविध प्रकारची पुस्तके ही माहिती व ज्ञानाचा स्रोत आहेत. विविध प्रकारची, विविध विषयांवरची पुस्तके वाचल्यास आपल्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचा विकास सहजरीत्या होत जातो.

वाचन करणाऱ्या व्यक्तींमध्ये उच्च बुद्धिमत्ता दिसून येते. वाचन व्यक्तीला अनुभव समृद्ध बनवत असते. वाचनात आलेली असंख्य पात्रे, अनुभव, प्रसंग आपणास असंख्य अनुभव देत असतात. वाचनाची सवय नसलेल्या व्यक्तीजवळ या अनुभव समृद्धतेचा अभाव असलेला दिसून येतो. वाचताना वाचक हा स्वतः लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव, प्रसंग जगत असतो. त्या पात्रांशी एकरूप होत असतो. आपण त्या कथेचा एक भाग बनतो. नैसर्गिकरीत्या पात्रांबद्दल सहानुभूती निर्माण होते. वेगवेगळ्या परिस्थितीत कसा परिणाम होतो, याबद्दल आपण अधिक जागरूक होतो. त्यातून इतरांना सहानुभूती दाखवण्याची आपली एकूण क्षमता वाढते. इतरांच्या भूमिकेत शिरून त्यांना काय वाटत आहे? या विषयी सहजपणे अचूक अंदाज बांधता येण्याची आपली क्षमता वाढते. यातून आपल्या समोर येणाऱ्या विविध प्रकारच्या किंवा स्वभावाच्या व्यक्तींशी सुदृढ व निकोप संबंध प्रस्थापित करता येतात. लोकांना त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारता येणे सहज शक्य होते. यामुळे आंतरव्यक्ती संबंध प्रभावीपणे निभावता येणे व्यक्तीला सहजशक्य होते.

वैविध्यपूर्ण आणि समृद्ध शैली असलेली पुस्तके मन मोकळे करतात. वाचनाची सवय आपल्यात सर्जनशील क्षमता आणि भाषा कौशल्ये वाढविते. अनेकदा चांगले वाचन आपणास लेखनासाठी प्रवृत्त करते. अनेकांचा असाही अनुभव आहे, की सतत काहीतरी चांगले वाचत राहिल्यामुळे त्यांना लिखाणाची प्रेरणा मिळाली आणि

त्यातून अनेक सुंदर पुस्तके, कथांचा जन्म झाला; म्हणजेच वाचनातून अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळते आणि प्रावीण्य प्राप्त होते. व्यक्तीला भाषा वापरण्याची कला अवगत होत जाते. वाचनातून आपल्या शब्दसंपत्तीत कमालीची वाढ होण्यास मदत होते. एका शब्दाच्या विविध अर्थांचा परिचय होतो. यातून भाषा समृद्ध होण्यास मदत होते.

प्रेरणादायी वाचनात आपले जीवन पूर्णपणे बदलण्याची क्षमता असते. जीवनाकडे समग्र आणि सकारात्मक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. चरित्रात्मक पुस्तकांचे वाचन आपणास कठोर परिश्रम करण्यास प्रेरित करते. अशी पुस्तके आपले ध्येय साध्य करण्यासाठी जीवन समर्पित करायला प्रोत्साहित करतात. यातून आपण निश्चितच एक चांगली व्यक्ती बनू शकतो.

वाचनाच्या सवयीमुळे आपणास कधीही कंटाळा येत नाही किंवा एकटेपणा वाटत नाही. पुस्तकांना आपला गुरू म्हटले आहे, ते यामुळेच. ग्रंथ व पुस्तके आपणास आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उत्तम प्रकारे मार्गदर्शक ठरत असतात. कादंबरी, कथा, कविता इत्यादींच्या वाचनातून ज्ञान व माहितीबरोबरच आपले मनोरंजनही होते. मनाला शांती मिळते. वाचनामुळे आपला वेळ सत्कारणी लागतो.

आपण वाचलेल्या प्रत्येक गोष्टीची कल्पना करण्याचा प्रयत्न करत असतो. वाचताना कोणत्याही प्रकारचे इतर विचार मनापासून दूर राहतात. यातून आपली एकाग्रता वाढते. कोणत्याही बाबीवर, एकाग्रतेने सर्व पैलूंचा विचार करून निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागते. वाचन हा आपल्या मनाच्या व आरोग्याचा व्यायाम आहे; जो रोज केल्यास त्याचे अनेक प्रकारचे फायदे आपणास पाहावयास मिळतात. वाचनामुळे आपले भावनिक आरोग्यदेखील सुधारते. एक चांगले पुस्तक आपणास भावनिक समाधान देण्यास मदत करते. वाचनामुळे आपली स्मरणशक्ती सुधारण्यास मदत होते. संवाद कौशल्य सुधारते. वाचन करत असताना आपण त्यात रमून जातो. आपण आपला भूतकाळ विसरून वर्तमानात जगतो. यामुळे व्यक्ती आपल्या वाईट आठवणी सहजतेने विसरू शकते. त्यातून आपला ताण कमी होण्यास खूप मदत होते. पुस्तकांमध्ये एक अद्‌भुत शक्ती असते, ज्यातून व्यक्तीला ज्ञान मिळविण्याची, वाढवण्याची आणि प्रेरित राहण्यासाठी नवीन संधी मिळत राहते.

चांगली पुस्तके ही मोठी गुंतवणूक असते. वाचनाची सवय एक उत्कृष्ट सवय आहे. ही सवय प्रत्येकाने लावून घेतल्यास प्रत्येकाचे वैयक्तिक जीवन समृद्ध होऊन एक सुदृढ समाज निर्माण होण्यास मदत होईल. वाचनामुळे व्यक्तीला जीवनात पुढे जाण्यासाठी नवीन आणि चांगल्या कल्पना मिळतात. आपल्याला आपल्या जीवनात प्रगती आणि विकास करायचा असेल, तर वाचनाची सवय लावून घेणेच महत्त्वाचे आहे. वाचनाने आपले मन तरुण व निरोगी राहण्यास मदत होते. आपले मन अधिक सर्जनशील बनते. वाचनाने आपले लक्ष एकाच बाबीवर केंद्रित होते. आपणास एकटेपणा जाणवत नाही. पुस्तके आपले उत्तम मित्र ठरू शकतात. वाचनातून सतत सकारात्मकता निर्माण झाल्याने आयुष्यात कोणत्याही परिस्थितीत निराशा आपल्याजवळ येऊ शकत नाही. वाचनाने शांती मिळते. वाचन हा मन शांत करण्याचा उत्तम मार्ग आहे. वाचनाची सवय ही आपणाला एक चांगली व्यक्ती बनवते, म्हणूनच वाचन संस्कृतीचे संवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे.

# वाचन संस्कृतीच्या विकासात शाळेची भूमिका

**डॉ. गोविंद नांदेडे**
पूर्व शिक्षण संचालक,
महाराष्ट्र शासन, पुणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३८९४१४

भाषा शिक्षणात श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या चार घटकांचा किंवा कौशल्यांचा अंतर्भाव होतो. यांपैकी भाषण म्हणजे भाषा बोलणे आणि वाचन ही दोन कौशल्ये अधिक मूल्यवान आहेत. वाचन हा भाषाशिक्षणातील व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. वाचन ज्ञानार्जनाचा सर्वांत सुंदर असा मार्ग आहे. शाळेतील विद्यार्थी जेव्हा पुस्तक वाचायला शिकतो, तेव्हा त्याला आणि त्याच्या शिक्षकांसह कुटुंबातील सर्वच सदस्यांना होणारा आनंद अवर्णनीय असाच असतो. आपला मुलगा किंवा मुलगी शाळेत यायला लागल्यावर तो शिकायला लागल्याची निश्चिती आणि शाश्वती यांचा वाचन हा एक विश्वसनीय असा पुरावा मानला जातो. श्रवण आणि भाषण या प्रारंभिक कौशल्यांच्या सादरीकरणाची विश्वासार्हता मूल्यांकित करणे शाश्वतीच्या कसोटीवर खूप कठीण जाते; म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे तर मुलगा भाषा ऐकू लागला, तर तो अर्थ समजून ऐकतो की नाही या बाबीचे मूल्यमापन करणे, तसे जिकिरीचेच असते. बोलण्याबाबत देखील अशा संभ्रमाला बराच वाव असतो. तथापि, मुलगा अथवा मुलगी वाचन करू लागले, की त्यातील अस्खलितपणा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करू लागतो. थोडक्यात विद्यार्थी घडाघडा वाचायला लागले, की त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीची शिक्षक आणि पालकांना शाश्वती वाटते, म्हणून वाचन हे विद्यार्थ्यांच्या शाळेतील संपादणुकीचे विश्वासार्ह मूल्यांकन ठरते.

> *लहान मुलांची शिक्षकांवर फार श्रद्धा असते. शाळेत त्यांनी सांगितले ते ब्रह्मवाक्य वाटते. हा स्वभाव लक्षात घेता शाळेत बालवयात वाचनाची गोडी लावणे सहज शक्य आहे. वाचनासाठी आनंददायी उपक्रम राबविण्याची शाळांनी तयारी दर्शवली तर वाचनाची गोडी लावणे अवघड नाही. वाचन संस्कृतीच्या विकासात शाळेने मोठे योगदान दिले तर ही समस्या राहणारच नाही.*

**(१) वाचन म्हणजे काय? :** आपण वाचन करतो म्हणजे काय करतो? वाक्य हे भाषेचे महत्त्वाचे एकक असते. अर्थपूर्ण शब्दांपासून अर्थपूर्ण वाक्य तयार होते. संवादी वाक्ये एकत्र आली, की आशयपूर्ण उतारा तयार होतो. अशी वाक्ये आपण वाचतो, तेव्हा मन आणि मेंदूत पूर्वानुभवाने ज्ञात असलेल्या शब्दांचा अर्थपूर्ण आशय संघटित होऊन वाचकास त्याला ज्ञात असलेला अर्थाशय आनंद देतो. वाचनातून त्या वाचकास मिळणारा आनंद विश्वातील सर्वांत निखळ आणि निर्मळ आनंद असतो. वाचनाची एकदा अभिरुची निर्माण झाली, की माणूस सतत वाचत जातो आणि वाचनसमृद्ध, ज्ञानी आणि सामर्थ्यवान बनतो. थोडक्यात आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण म्हणजे वाचन होय.

**(२) वाचनाचे दोन प्रकार :** वाचनाची एकदा आवड निर्माण झाली, की विद्यार्थी अक्षरश: पुस्तकांवर

तुटून पडतात. शालेय जीवनात वर्गात मुले मूकवाचन आणि प्रकटवाचन अशा दोन प्रकारचे वाचन करतात. ओठ बंद करून एकाग्र चित्ताने ओळींवरून नजर फिरवत, मनात अर्थ आणि आशयाचे संघटन आणि संकलन करत केलेले वाचन मूकवाचन होय. पुढे विद्यार्थी मोठे होऊ लागले, की अधिक वाचन करण्यासाठी 'मूकवाचन' हाच उत्तम प्रकार असतो. प्रारंभिक वर्गात विशेषतः सातव्या-आठव्या वर्गापर्यंत विद्यार्थी ओळीवरून नजर फिरवत, मुखातून मोठ्या आवाजात वाचन करतात, तेव्हा ते प्रकटवाचन असते. प्रकटवाचन इयत्ता चौथी-पाचवीपर्यंत विशेषत्वाने केले जाते. अशा वाचनातून आपला मुलगा वाचन करत असल्याचे शिक्षकांच्या, पालकांच्या निदर्शनास येते आणि त्यातून शिक्षणाचे प्रकट रूप दृग्गोचर होते. पालक आणि गावकऱ्यांना घडाघडा वाचन करणारे विद्यार्थी आवडतात. त्यांना हुशार म्हणून शाबासकी दिली जाते आणि त्यांच्या शिक्षकांचेही कौतुक केले जाते.

(३) **आशयपूर्ण वाचन :** समृद्ध आशय असलेले वाचन विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करते. आशयाचे सात्मीकरण (आत्मसात करून) केलेले वाचन विद्यार्थ्यांच्या मनाला आनंद देते. ज्ञान, आकलन, तर्क, अनुमान, विश्लेषण यांसारख्या मनःशक्ती आशयपूर्ण वाचनाने समृद्ध होत जातात. विद्यार्थी, शिक्षक आणि एकूणच माणसाची समृद्ध जीवनाकडील वाटचाल प्रशस्त होण्यासाठी आशयपूर्ण वाचन अनिवार्य असते.

(४) **वाचन संस्कृती म्हणजे काय ? :** वाचनाची समृद्ध परंपरा वाचन संस्कृती या शब्दात अभिप्रेत आहे. वाचन संस्कृतीला हजारो वर्षांचा इतिहास आहे. संस्कृती हा शब्द वि. का. राजवाडे यांनी सर्वप्रथम (culture) कल्चर या इंग्रजी शब्दासाठी वापरला आहे. संस्कारातून संस्कृती जन्माला येते. नुसते वाचणे म्हणजे वाचन संस्कृती नव्हे. वाचनातून वर्तनबदल अपेक्षित आहे. भारतीय जनमानसात वाचन संस्कृती रुजवणे आणि समृद्ध करणे अतिशय आवश्यक आहे. थोडक्यात वाचनाची समृद्ध परंपरा निर्माण करून ती समाजधारणा आणि मूल्याधिष्ठित समाजजीवन विकसित करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

(५) **वाचन संस्कृती आणि शाळा :** शालेय वयात लावलेल्या सवयी, केलेले संस्कार आयुष्यभर टिकून राहतात. वाचनाची एकदा सवय लागली, की विद्यार्थी अधिक समृद्ध आणि बुद्धिमान होत जातो. विद्यार्थ्यांना त्यांच्या आकलन क्षमतेनुसार चांगल्या पुस्तकांच्या वाचनाची गोडी लावणे हा वाचन संस्कृतीचा सरळ, सोपा अर्थ आहे. आयुष्यभर वाचन करून आपले जीवन समृद्ध करणे, हा शालेय जीवनातील वाचन संस्कृतीचा अर्थ आहे. शालेय विद्यार्थ्यांना वाचनाच्या चांगल्या सवयी लावण्यासाठी शाळेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

(६) **समृद्ध शालेय ग्रंथालय :** आता महाराष्ट्रात बहुतांश शाळांमध्ये ग्रंथालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाकडून शाळा ग्रंथालयांसाठी अतिशय चांगली ज्ञानवर्धक आणि संस्कारप्रद पुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. शिक्षकांनी निधी, देणग्या, ग्राममदत यांद्वारे आपल्या शाळेचे ग्रंथालय समृद्ध करण्याचा प्रयास करावा; जेणेकरून विद्यार्थ्यांना हवे असेल ते पुस्तक मिळेल.

(७) **वाचन कट्टा :** शाळा, विद्यार्थ्यांचे अत्यंत हळवे भावविश्व असते. या वयातील आठवणी

आयुष्यभर स्मृतींचा आनंद देत राहतात. शाळेच्या मैदानात विशाल वृक्षाखाली छानपैकी ओटा बांधून बसण्यासाठी व्यवस्था करून, तिथे वयानुकूल पुस्तके दररोज उपलब्ध करून दिल्यास ग्रंथालयात वाचन कसे करावे या वर्तन संहितेचाही सुंदर संस्कार होईल.

(८) **शिक्षकांनीही वाचन करावे :** मोकळ्या वेळात शिक्षक मित्रांनी शाळेत विद्यार्थ्यांसोबत वाचन करण्याची सवय ठेवावी. शिक्षकांची ही सवय विद्यार्थ्यांना वाचन करायला प्रेरित करते. एरवी देखील शिक्षकांच्या हातात पुस्तक दिसले, की विद्यार्थ्यांच्या मनावर चांगला संस्कार होऊन विद्यार्थीदेखील फावल्या वेळात व्यक्तिगत जीवनातही पुस्तकांशी नाते जुळवून ठेवतील. शिक्षक जसे बोलतात, वागतात, कृती करतात अगदी त्याच पद्धतीने वागण्याचा प्रयत्न विद्यार्थीही करतात.

(९) **वाचन, नोंदी आणि पुरस्कार :** विद्यार्थी शाळेत, वाचनालयात आणि वाचन कट्ट्यावर जितकी पुस्तके वाचतील त्या पुस्तकांची शीर्षके, लेखक, आशय आणि पुस्तक वाचून कधी पूर्ण केले यांच्या नोंदी त्यांनी करून ठेवल्यास एक अत्यंत सुंदर संस्काराची शिस्त विद्यार्थी जीवनापासून दृढ होत जाईल. विद्यार्थ्यांचे जीवन अधिकाधिक समृद्ध होत जाईल. ज्या विद्यार्थ्याने सर्वाधिक चांगली पुस्तके वाचून नोंदी ठेवलेल्या असतील, अशा पाच विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्याचा कार्यक्रम केल्यास सर्वच विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागेल.

(१०) **परिपाठात पुस्तक चर्चा :** दैनिक परिपाठात दररोज एका विद्यार्थ्याला त्याने वाचलेल्या चांगल्या पुस्तकाविषयी चार-पाच मिनिटांत वर्णन करून सांगायची सवय लावावी म्हणजे सर्वच विद्यार्थ्यांना त्या पुस्तकांची ओळख होईल आणि वाचन संस्कृती रुजायला वेळ लागणार नाही.

(११) **परिपाठात दैनिक अभिवाचन :** सकाळी शाळेच्या परिपाठात दररोज एका चांगल्या पुस्तकाचे एक पान किंवा प्रकरण सुंदर आवाजात, साभिनय वाचून घेतल्यास चांगले ऐकण्याच्या सवयीतून मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजवता येईल. श्यामची आई, किशोर मासिकातील कथांचे अभिवाचन केल्यास मिळणारा आनंद खूप आत्मिक असतो. यातून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागण्यास मदत होईल.

(१२) **कथा, काव्य लेखन स्पर्धा :** विविध प्रसंगी विद्यार्थ्यांच्या वर्गनिहाय कथा आणि काव्य स्पर्धा, देशभक्तीपर काव्यस्पर्धा, ग्रामीण जीवनानुभवावर आधारित अनुभव शब्दबद्ध करण्याची स्पर्धा अशा स्पर्धा घेऊन पहिल्या तीन कथांना, कवितांना पुरस्कार आणि प्रशस्तिपत्रे देऊन सन्मान करण्यात यावा. पुरस्कारप्राप्त कथा, कवितांचे भित्तिपत्रक प्रत्येक महिन्याला शाळेत लावल्यास सर्व विद्यार्थी त्याचे वाचन करतील आणि प्रेरित होऊन लेखन, वाचनास प्रवृत्त होतील.

वैभवशाली, प्रज्ञावंत, प्रतिभाशाली राष्ट्र निर्माणासाठी शाळांतून वाचन संस्कृती समृद्ध करणे काळाची गरज आहे. चला शिक्षक आणि विद्यार्थी मित्रांनो, वाचन संस्कृतीचा उच्चरवाने उद्घोष करू आणि एका नव्या भारताच्या निर्माणाचा ध्यास घेऊ.

■■■

# पुस्तके वाचूया, जीवन घडवूया!

**संदीप वाकचौरे**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
संगमनेर, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९४०५४०४५००

दिवसातील एक तास तुम्ही पुस्तक वाचनासाठी राखून ठेवा. अवघ्या काही वर्षांत तुम्ही ज्ञानकेंद्री बनाल. माणसे जीवनात समृद्ध होतात, ती केवळ धनसंपत्तीने नव्हे, तर त्यांच्याकडील ज्ञानसंपत्तीने ज्ञानाची समृद्धता किती आहे, त्यावर त्या व्यक्तीची उंची अवलंबून असते. प्रत्येकाच्या जीवनात अनुभव समृद्धीचा राजमार्ग वाचनाच्या वाटेने जातो. पुस्तके ही जीवन परिवर्तनाचे साथी आहेत. माणसे आपल्याला धोका देतील; पण पुस्तके धोका देण्याची शक्यता अजिबात नसते. जीवनात जेव्हा गोंधळाची स्थिती निर्माण होते, तेव्हा पुस्तकेच जीवनात प्रकाश घेऊन येतात. पुस्तकांमुळे अनेकांचे आयुष्य मार्गी लागते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी अनेक ठिकाणी आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व नमूद केले आहे. पुस्तकांमुळे त्यांच्या विचारांची जडणघडण झाली. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे त्यांनी सकारात्मकतेने पाहिले. जीवनात सर्वोच्च पदावर पोहोचल्यानंतरही त्यांचा जीवनप्रवास हा अत्यंत सामान्य माणसासारखाच राहिला, त्यामुळे ते कायम समाजमनावर गारूड करणारे राष्ट्रपती ठरले. प्रत्येक भारतीयाच्या मनात त्यांना आदराचे स्थान मिळाले. त्यांनी निर्माण केलेली पाऊलवाट आपल्याला महासत्तेपर्यंत पोहोचवल्याशिवाय राहणार नाही. कलामांसारख्या एका गरीब कुटुंबातील मुलालाही भारताच्या राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचता आले, याचे कारण पुस्तकांशी असलेली संगत होती असे म्हटले, तर वावगे ठरू नये. जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांची पुस्तकांशी असलेली संगत सुटली नाही हे विशेष. त्यांच्या जीवनाला जशी पुस्तकांमुळे परिवर्तनाची वाट सापडली, तशी प्रत्येकाला ती सापडावी, यासाठी शाळांनी प्रयत्न करण्याची गरज सतत व्यक्त केली जाते. शिक्षणात पाठ्यपुस्तकातील आशय शिकवला जात असला, तरी त्या मार्गाने शिक्षणाची उद्दिष्टे पूर्णतः साध्य होण्याची शक्यता कधीच नसते. त्याकरिता विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तकांशिवाय इतर पुस्तके देण्याची नितांत गरज आहे. पुस्तके हाती दिली, तरच मस्तके घडली जातात. ज्यांची मस्तके पुस्तके घडवितात, ती कोणाच्याही चरणावर लाचारीने नतमस्तक होत नाहीत; त्यामुळे आपल्याला समृद्ध समाज उभा करायचा असेल, तर शिक्षण हा राजमार्ग आहे आणि त्या राजमार्गाने चालणाऱ्या प्रत्येकाच्या विकासासाठी शाळांनी पुस्तके देण्याची गरज आहे. त्यासाठी शाळांमध्ये ग्रंथालय असलेच पाहिजे समृद्ध ग्रंथालय समृद्ध समाज घडविण्याला हातभार लावतात. त्यामुळे शाळांची जबाबदारी मोठी आहे.

> *“उद्याचा समाज अधिक उन्नत, समृद्ध आणि लोकशाहीला पोषक असा निर्माण करायचा असेल, तर घरात पुस्तके आणि गावात ग्रंथालय असले पाहिजे. पुस्तके अहिंसेचा विचार पेरतात आणि हिंसक हातातील शस्त्रे त्यामुळे गळून पडतात; इतके पुस्तकांच्या वाचनाचे महत्त्व आहे.”*

पुस्तकांनी या देशाला अनेक चांगली माणसे दिली. महात्मा फुले, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारखी अनेक माणसे

केवळ पुस्तकांमुळे घडली आहेत. मुळात पुस्तके काय करतात असा प्रश्न विचारला, तर पुस्तके माहिती देतात. ज्ञानाची प्रक्रिया घडवून आणतात, पुस्तके माणसांच्या मनाचे मनोरंजन करतात, पुस्तके जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देतात आणि पुस्तके माणसाला जगण्यासाठी मार्ग दाखवतात. पुस्तकांमुळे माणसाला आनंदाची वाट सापडते.

वाचनाने ज्यांचे जीवन घडले अशा थोर माणसांचा संपूर्ण जीवन प्रवास विवेक आणि शहाणपणाच्या दिशेचा आहे. महात्मा गांधी यांनी म्हटले आहे की, 'जगाच्या पाठीवर असलेल्या नवरत्नांपेक्षा पुस्तके ही महत्त्वाची रत्ने आहेत. ही पुस्तके ज्यांच्या आयुष्यात येतात, त्या माणसांचे जीवन बदलले आहे. जगातील अनेक राष्ट्र निर्मात्यांच्यावर देखील पुस्तकांचा मोठा प्रभाव आहे. त्यांनी म्हटले आहे, की जीवन प्रवासात प्रत्येक क्षणी पुस्तके मार्ग दाखवत असतात.

आपल्याला अज्ञान दूर करायचे असेल, तर पुस्तकांची नितांत गरज आहे. अज्ञानी याचा अर्थ निरक्षर असा मात्र नाही, हे लक्षात घ्यायला हवे. जगाच्या पाठीवर अनेकांनी आपल्या स्व–विकासाच्या वाटा पुस्तकांच्या मदतीने धुंडाळल्या आहेत. अनेक पुस्तकांनी राष्ट्र, धर्म, जात आणि पंथाच्या सीमारेषा पुसत जगभरातील माणसांच्या मनावर अधिराज्य केल्याचा इतिहास आहे. पुस्तकाचे मोल लक्षात घेऊन शाळांशाळांमधून पुस्तके हाती देण्याची मोहीम राबविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांचे पुस्तकांशी नाते जुळले जाण्याची गरज आहे.

माणसाचे जगणे हे अधिक अर्थपूर्ण करण्यात पुस्तकांचा सर्वांत मोठा वाटा आहे. पुस्तके जीवनात आली, की जीवन विचारांच्या प्रकाशात उजळून निघते. समाज अधिक चांगला, समृद्ध करण्याची वाट ही पुस्तकाने घडलेल्या माणसांच्या मस्तकातून जात असते. पुस्तके माणसांमध्ये सर्जनशीलता पेरत असतात आणि कल्पकतेचा विचारही अधोरेखित करत असतात. पुस्तके आपल्याला इतिहासात घेऊन जातात, तेथील वैभवाचे दर्शन घडवतात, युद्धाचा इतिहास सांगतात आणि भविष्यात नवनिर्मितासाठी शक्ती देत असतात. भविष्यासाठीची दृष्टी प्रदान करत असतात. जगाच्या कितीतरी पुढे जाण्याची शक्ती पुस्तकात सामावलेली असते. पुस्तके माणसाला दुःख, निराशा, मानसिक द्वंद्व स्थितीतून बाहेर काढण्याचे काम करत असतात. आनंदाच्या क्षणीही संयमाने जगण्यासाठी दिशा दाखवितात. पुस्तकांनी अनेकांना ध्येये दिली आहेत. त्यातून अनेकांना आयुष्याची वाट सापडली आहे. पुस्तके माणसाला संवेदनशीलता प्रदान करतात. सदसद्विवेकबुद्धी जागी ठेवण्याचे कामही पुस्तके करतात. जगप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स्टाईन यांना अवघ्या बाराव्या वर्षी त्यांचे गुरू 'मॅक्स टॅलमूड' यांना 'युक्लिडियन भूमिती' हे पुस्तक भेट दिले होते. या पुस्तकातून त्यांना जीवनाची प्रकाशमय वाट सापडली. त्या पुस्तकाने प्रेरित होऊन वैश्विक सत्याच्या दिशेने जाण्यासाठी त्यांना बळ प्राप्त झाले होते. त्या सामर्थ्यावर जीवनाची वाटचाल करत त्यांनी वैज्ञानिक क्षेत्रावर अधिराज्य केले आहे, हे संपूर्ण जग अनुभवते आहे.

आपल्याला उद्याचा समाज अधिक समृद्ध आणि लोकशाही व्यवस्थेला पूरक निर्माण करायचा असेल आणि माणसांच्या हाती शस्त्रे येऊ नयेत असे वाटत असेल, तर माणसांच्या हाती पुस्तके देण्याची व्यवस्था करण्याची गरज आहे. पुस्तके माणसांना हिंसेपासून परावृत्त करण्याचे काम करतात आणि अहिंसा मनात रुजवत असतात. कोणाला तरी दगड मारण्यापूर्वी विचार करण्यासाठीचे शहाणपण पुस्तके देत असतात. ध्येय प्राप्त करण्याचा नैतिक मार्ग पुस्तके दाखवत असतात. त्यामुळे ध्येयाच्या दिशेचा प्रवास घडविण्यासाठी, पुस्तके महत्त्वाची भूमिका वठवत असतात. माणसाच्या मनाची उंची वाढवण्यात पुस्तकांचा मोठा सहभाग असतो. आपल्या प्रत्येक कामात आपण योग्य दिशेने चाललो

आहोत का? यासाठी माणसांना आत्मपरीक्षणाची गरज असते, मात्र त्यासाठी मनात हिंमत असावी लागते. ती हिंमत वाढविण्याचे काम पुस्तके करत असतात; म्हणूनच आपल्याला अधिक उन्नत समाजव्यवस्थेच्या निर्माणासाठी मुलांच्या हाती पुस्तके येतील, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. घरात पुस्तके आणि गावात ग्रंथालय असण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे.

पुस्तकांचे मोल सातत्याने व्यक्त करण्यात आले आहे. जगाच्या पाठीवर प्रगत झालेले देश शिक्षणातून प्रगत झाले आहेत. शिक्षण हे पुस्तकांच्या सोबतीने होत असते. आपल्याला शिक्षणात गुणवत्ता हवी आहे, त्यासाठी विविध संकल्पना समजून घेण्याची गरज आहे. त्या स्पष्ट होतील अशा स्वरूपाची पुस्तके वाचली गेली पाहिजेत. पुस्तके मुलांच्या मनात स्वप्न पेरण्याचे काम करतात. शाळांनी आपल्या साप्ताहिक वेळापत्रकात अवांतर वाचनाची तासिका राखीव ठेवण्याची गरज आहे. जेव्हा एखादे शिक्षक रजेवर असतात तेव्हा, त्यांच्या तासाला मुलांना ग्रंथालयात घेऊन जावे. मुलांना आवडीप्रमाणे पुस्तके उपलब्ध करून द्यावी. शाळेत अशा स्वरूपाचा वाचनसंस्कार झाला, तर त्याचा व्यापक परिणाम शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यात होतो, त्याचवेळी व्यक्तिमत्त्वावरदेखील चांगला परिणाम होतो. आपल्याकडे सातत्याने शिस्तीचा प्रश्न उपस्थित केला जातो; पण पुस्तके हाती दिली गेली आणि त्यातून विचारांची पेरणी झाली, तर विद्यार्थी स्वयंशिस्तीच्या दिशेने पावले टाकण्याची शक्यता अधिक आहे.

■■■

**(पृष्ठ क्र. १७ वरून)**

presentation of words; repeat the words, joining individual words, practice of reading etc.

**(3) Phrase Method :** It is a mid-way between word method and sentence method. It is conducted through presentation of list of phrases, look at the phrases attentively, repeat it foe several times etc.

**(4) Sentence Method :** It is opposite to alphabetic method. Here the unit of teaching is sentence. It is conducted through selection of sentence, sentences with pictures; recognize the sentence, read the sentence etc.

**(5) Story Method :** It is an advance over sentence method. The unit of teaching is a story. It is conducted through by telling a story, discusses the events in the story, writes the story, recognize the sentences etc.

The learner of a language must know reading skill. The learner should have mastery over stress, intonation, pauses, juncture, fluency, pronunciation etc. to develop reading skills. Reading indicates towards knowing of language, Reading helps in knowing world's news, information through different resources. Reading is a good source of self-education. The intellectual advancement of a learner is limited, if he is unable to read.

■■■

**वर्गणीदार होण्यासाठी**

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# पुस्तक मैत्री

**वंदना कुलकर्णी**
समन्वयक, पुस्तक–मैत्री अभ्यासक्रम
भ्रमणध्वनी : ९८८१४८८८७७

*'बेहतर जिंदगी का रास्ता*
*अच्छी किताबों से होकर गुजरता है'*

दि. २३ एप्रिल, 'जागतिक पुस्तक' दिनाच्या निमित्ताने असे कितीतरी संदेश, कविता दिल्या–घेतल्या गेल्या. शहरातील बुक कॅफेमध्ये लेखकांसोबत गप्पांच्या मैफिली झडल्या. डोंबिवलीमध्ये पहाटे ५ वाजल्यापासून ३०० मीटर रस्त्यावर दुतर्फा वाचकांसाठी भेट–पुस्तके अंथरली होती, रिक्षांमध्ये, खानावळींमध्ये किंवा केशकर्तनालयांमध्ये ग्राहकांसाठी पुस्तकालय सुरू करणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे व्हिडिओ समाजमाध्यमातून फिरले. पुस्तकांचे आपल्या आयुष्यातील महत्त्व झळाळून उठले. डोळ्यांसमोरचे मोबाईल फोनमध्ये डोकं खुपसून बसलेले आबालवृद्ध हे दृश्य हळूहळू धूसर होत जात आहे आणि मोबाईल फोनच्या जागी हातात पुस्तके येत आहेत.

> *अल्बर्ट आईन्स्टाईन यांना एकदा कोणीतरी विचारले, की आमच्या मुलांना बुद्धिमान बनवण्यासाठी आम्ही काय करायला हवे? ते म्हणाले, ''तुम्ही तुमच्या मुलांना बुद्धिमान बनवू इच्छित असाल, तर त्यांना पऱ्यांच्या गोष्टी वाचून दाखवा. त्यांनी अजून अधिक बुद्धिमान व्हावे असे वाटत असेल, तर तुम्ही त्यांना पऱ्यांच्या आणखी जास्त गोष्टी वाचून दाखवा.''*

जीवनात पुस्तकांना, साहित्याला काय स्थान आहे, काय असायला हवे, पुस्तकांचे महत्त्व काय आहे असे अनेक प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न सांस्कृतिक क्षेत्रातून येतात, तसे शिक्षणक्षेत्रातून विचारले जातात का? शिक्षणाची आणि साहित्याची इतकी फारकत का झाली असावी? पुस्तक संस्कृती न रुजण्यामागे काय कारणे आहेत याचा विचार करायला हवा.

शिक्षणाचे महत्त्व लक्षात येऊन शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. साक्षरतेचे प्रमाण वाढले. कालांतराने, 'शिकायचे कशासाठी, तर चांगली नोकरी मिळावी, जीवनात स्थैर्य यावे यासाठी' हा विचार वरचढ ठरला. शिक्षणाचा 'मुक्तिदायी' विचार मागे पडला. पाठ्यपुस्तके, त्यावर आधारित परीक्षा, पाठांतर आणि गुण यांना अतोनात महत्त्व आले. सर्वांगीण विकास होण्यासाठी शिकायचे याकडे दुर्लक्ष होऊ लागले. हे लक्षात घेऊनच पाठ्यपुस्तकाखेरीज इतर पुस्तकांच्या वाचनाकडे लक्ष दिले पाहिजे यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे हा विचार प्राधान्याने मांडला जाऊ लागला.

वाचनासंदर्भात शैक्षणिक धोरणे काय म्हणतात हे पाहणे उपयुक्त ठरेल. १९५२–५३ च्या मुदलियार आयोगापासून शिक्षणविषयक विविध समित्या, कोठारी आयोग, राममूर्ती आयोग अशा सर्वांनी शाळांमध्ये वाचनालये असण्याची गरज हा मुद्दा मांडला होता. NCF 2005, शिक्षण अधिकार कायदा यामध्येही याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आलेले आहे. प्रत्येक दस्तऐवजामध्ये वाचनालये असण्याची व ती चांगल्या प्रकारे चालवली जाण्याची गरज अधोरेखित करण्यात आलेली आहे. सर्व शिक्षा अभियान, ऑपरेशन ब्लॅकबोर्ड

यांसारख्या योजनांद्वारे प्रयत्न करण्यात येऊन वाचनाकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. अर्थात या योजनांमुळे १००% यश आले असे म्हणता येणार नाही.

अगदी अलीकडच्या NEP - 2020 च्या धोरणामध्ये वाचन संस्कृती रुजवण्याची आवश्यकता आणि मुलांसाठी शाळा–वाचनालये, समुदाय–वाचनालये, फिरती वाचनालये निर्माण करण्याची गरज मांडलेली आहे.

'निपुण भारत' अभियानामध्येही मूलभूत साक्षरतेला महत्त्व देताना मुलांमध्ये अगदी लहान वयापासून वाचनाची आवड निर्माण करण्याचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बालसाहित्याला असणारे महत्त्व, त्याची उपलब्धता आणि प्रकटवाचन, सहभागी वाचन, कथाकथन, कविता वाचन, चित्रवाचन, पुस्तकांशी संबंधित विविध उपक्रम यांचे महत्त्व सांगितले आहे.

शैक्षणिक धोरण आणि वास्तव यांमधील अंतर कमी करायचे असेल, तर वाचनाची गोडी लावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेचा 'पुस्तक मैत्री अभ्यासक्रम' हे या दिशेने टाकलेले असेच एक महत्त्वाचे पाऊल आहे.

**पुस्तक मैत्री अभ्यासक्रम :**

*हे नच पुस्तक, ही तर खिडकी*
*जग भोवतीचे बघण्यासाठी*
*हे नच पुस्तक, ही तर दुर्बीण*
*अदृश्याला भिडण्यासाठी!*

पुस्तके काय असतात, काय करतात याची अगदी नेमकी नस या अवघ्या चार ओळींमध्ये पकडण्यात आलेली आहे! वाचनाचे आयुष्यातील स्थान फार मोठे आहे. वाचनातून मिळणाऱ्या आनंदापासून ते वाचकाच्या सर्वांगीण विकासापर्यंत याचे अनंत फायदे आहेत, म्हणून पुस्तकांशी सर्वांची मैत्री व्हायला हवी; तीही अगदी बालवयापासून. यामध्ये बालकांच्या आसपासच्या प्रौढांची भूमिका फार महत्त्वाची आहे. ती कोणती आणि ती कशी साकारायला हवी हे उलगडून दाखवणारा प्रात्यक्षिक आणि सिद्धांत यांचा सुरेख मेळ घालणारा हा 'पुस्तक मैत्री' अभ्यासक्रम आहे.

जगभरातील अनेक संशोधनांनी हे दाखवून दिलेले आहे, की ज्या मुलांना अगदी बालवयापासून पुस्तकांची जादू अनुभवायला मिळते त्या मुलांना वाचन–लेखन ही अतिशय गुंतागुंतीची असणारी प्रक्रिया सहजपणे जमतेच; पण चौफेर आणि चिकित्सक विचार करणे, सहभाव (empathy), प्रश्नांना भिडण्याची व ते सोडवण्याची क्षमता यांसारखी जीवनकौशल्येही त्यांच्यामध्ये आत्मसात होतात. पुस्तकालय ही अशी एक सुरक्षित जागा आहे, जिथे शिकण्याच्या अशा अनेक शक्यता दडलेल्या आहेत; म्हणूनच शालेय शिक्षणात वाचन फार महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी वाचनाची आवड निर्माण करणारे शिक्षक, पुस्तकांचे अनोखे, जादुई जग खुले करणारे समृद्ध वाचनालय प्रत्येक मुलासाठी सहज उपलब्ध असायला हवे. दुर्दैवाने फार कमी घरांमध्ये आनंदाने वाचणारी मोठी माणसे, छापील मजकूर असणारे साहित्य मुलांच्या दृष्टीस पडते. वाचनाची अनौपचारिक ओळख न झाल्यामुळे शाळेतील वाचन मुलांना परके वाटते आणि अवघड जाते. शिक्षक म्हणून ही जाणीव असणे महत्त्वाचे आहे. अशा वेळी बालसाहित्य आपल्या मदतीला येते. 'वाचनाची गरज' या घटकातून अशा अनेक मुद्द्यांचा ऊहापोह करण्यात येईल.

पुस्तक मैत्री अभ्यासक्रमाचा दुसरा घटक आहे अंकुरती साक्षरता आणि बालसाहित्य. या घटकातून अक्षर ओळख करून घेताना आणि शब्दांच्या पलीकडे जाताना काय काय प्रक्रिया घडतात हे समजायला मदत होईल. आपण वर्षानुवर्षे मुलांना मुळाक्षरांनी आणि बाराखडीने सुरुवात करून वाचन शिकवत

आलो आहोत. मात्र आज पारंपरिक वाचनापूर्वीच मुले स्व–लिपीत अभिव्यक्त होऊ लागतात, पुस्तक घेऊन वाचनाचे नाटक करू लागतात, पुस्तकात चित्राखाली काहीतरी लिहिले आहे व त्यात गोष्ट आहे हे त्यांना कळायला लागते. साक्षरतेचा पहिला अंकुर तिथेच फुटायला लागतो. ही अंकुरती साक्षरता म्हणजे काय हे या घटकातून स्पष्ट होईल. 'अक्षरज्ञान आणि त्याला जोडून तयार होणाऱ्या शब्दाचा आवाज (ध्वनिउच्चार) ओळखणे म्हणजे वाचन.' अशी वाचनाची एक मर्यादित व्याख्या होती. वाचनाच्या इतक्या मर्यादित व्याख्येमुळे अर्थवलयांपर्यंत पोहोचणे, वाचनाचा आनंद घेणे या गोष्टी राहून जातात.

डेनिस फॉन स्टोकर यांच्या मते, 'वाचन ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. शब्द, वाक्य वाचता येण्याच्या पलीकडे जे वाचले, त्याचा अर्थ समजून घेऊन, आपल्या अनुभवांशी ताडून पाहून त्याचे चिकित्सक विश्लेषण करता येणे म्हणजे खरे वाचन, खरी साक्षरता. यासाठी शाळेत आणि शाळेबाहेर वैविध्यपूर्ण, आनंददायी वाचन अनुभव मुलांना मिळायला हवेत.' हे अनुभव कसे द्यायचे, त्यासाठीचे साहित्य कसे निवडायचे, त्याचा उपयोग कसा करायचा याची समज विकसित व्हायला हा घटक मदत करेल. याद्वारे वाचन म्हणजे काय, वाचनकौशल्य संपादित करण्यासाठी तोंडी भाषेचे महत्त्व, अंकुरत्या साक्षरतेकडून ओघवत्या वाचनापर्यंतचा प्रवास, वाचनाच्या अपयशाची कारणे जाणून घेता येतील.

पाठ्यपुस्तकांना अनेक मर्यादा असतात हे आपण जाणतोच. त्यामुळे काही वेळा ती कंटाळवाणीही होतात आणि शिकणे सीमितही करतात. पाठाखालील प्रश्नांची उत्तरे येणे याच्या पलीकडे जाऊन संकल्पना समजलेली असणे, स्वतःच्या भाषेत ती मांडता येणे, त्याविषयी अधिक जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे, त्या जिज्ञासा–पूर्तीसाठी पुस्तके, वाचनपूरक संसाधने आणि पूरक–पोषक वातावरण शाळेत, वर्गात असणे याला अधिक महत्त्व असायला हवे. पाठ्येतर साहित्याचा उपयोग केला गेला, तर शिक्षण नक्कीच अधिक रोचक आणि अर्थपूर्ण बनेल. केवळ भाषाच नाही तर विज्ञान, गणित, कला, समाजशास्त्र हे विषय समजण्यासाठीही पाठ्येतर पुस्तकांचा उपयोग कसा होऊ शकतो हे या घटकातून समजेल.

पुस्तक मैत्री अभ्यासक्रमाचा चौथा महत्त्वाचा घटक आहे सजीव पुस्तकालय. ज्येष्ठ पुस्तकमित्र उषा मुकुंदा म्हणतात त्याप्रमाणे ''सर्वोत्तम संग्रह, उत्तम सेवा, उत्तम सुविधा वापरणाऱ्या व्यक्तींचा स्पर्शच पुस्तकालयाला सजीव करू शकतो.''

आपल्या पुस्तकघराची मांडणी कशी हवी, मुलांना तिथे यावेसे वाटेल, पुस्तके वाचावीशी वाटतील यासाठी पुस्तकमित्राने काय काय करायला हवे, मुलांना वाचनास प्रोत्साहन देण्याची गरज आणि त्याच्या विविध पद्धती, त्यासाठीचे विविध उपक्रम यांबद्दलची माहिती देणारा हा घटक आहे.

पुस्तकसंग्रह कसा हवा, चांगली पुस्तके कशाला म्हणायचे याविषयीचा विचार या घटकात आहे. 'साहित्य हे आरसा असते आणि खिडकीही' हे लक्षात घेऊन पुस्तकाची निवड करायला हवी. पुस्तक मुलांच्या अनुभवविश्वाशी जवळचे, परिचित हवे, तसेच वेगळ्या जगाची, संस्कृतीची ओळख करून देणारेही हवे. समावेशी साहित्य, गोष्टींमधला बोध आणि तात्पर्य, बालसाहित्यामध्ये असणारी चित्रे, दृक् साक्षरता, साहित्याचे विविध प्रकार आणि त्यांचे महत्त्व अशा अनेक गोष्टींचा ऊहापोह या घटकामध्ये केलेला आहे.

साक्षरता, बालसाहित्य आणि वाचन याकडे बघण्याची नवी दृष्टी देणारा हा साडेचार महिन्यांचा अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम कोणासाठी तर 'पुस्तकांसह मुलांबरोबर काम करणाऱ्या प्रत्येकासाठी.' शिक्षक, पालक, कार्यकर्ते, ग्रंथपाल अशा सर्वांसाठी आहे.

हा अभ्यासक्रम दूरस्थ पद्धत आणि प्रत्यक्ष संपर्क सत्र अशा मिश्र पद्धतीने घेतला जाईल. पाच आणि चार अशी एकूण नऊ दिवसांची निवासी संपर्क सत्रे पुण्यामध्ये होतील. या सत्रांमध्ये दिलेल्या वाचन साहित्यावर सैद्धांतिक चर्चा होईल. तसेच पुस्तकालयाच्या कामकाजाचे आणि मुलांसह केल्या जाणाऱ्या विविध कृती–उपक्रमांचे प्रात्यक्षिक पाहायला आणि करायला मिळेल. पुस्तकालयाला भेटी होतील. मधल्या काळात दूरस्थ पद्धतीने अभ्यास होईल. यात स्वाध्याय सोडवणे, प्रकल्प करणे हे काम असेल. अभ्यासक्रमातून मिळालेला विचार कृतीत उतरवून बघणे असेल. या काळात ३ ते ५ जणांच्या गटाला एक मार्गदर्शकही असेल.

सर्व सहभागींना पुस्तक मैत्री अभ्यासक्रम वाचनसाहित्य संच भाग–१ व २ देण्यात येतील. अशा तऱ्हेचे अभ्यासक्रम काही वर्षांपासून हिंदी आणि इंग्रजीमधून भोपाळ आणि गोव्यामध्ये तिथल्या संस्था घेत आहेत. त्याचे खूप चांगले परिणाम मुलांपर्यंत पुस्तके पोहोचण्यामध्ये, वाचनाची आवड लागण्यामध्ये, पुस्तक संस्कृती रुजण्यामध्ये होताना दिसत आहेत. मुलांच्या चांगले बालपण मिळण्याच्या हक्कामध्ये 'चांगली पुस्तके उपलब्ध असण्याचा हक्कही' आहेच की.

### पुस्तक मैत्री पायलट अभ्यासक्रम २०२२ :

गेल्या वर्षी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून आलेले २५ शिक्षक, कार्यकर्ते यांच्या सहभागातून पायलट स्वरूपात हा अभ्यासक्रम घेण्यात आला. यातून मिळालेल्या शिदोरीतून अनेकांनी पुस्तकांना केंद्रस्थानी ठेवून काम करायला सुरुवात केलेली आहे. नमुन्यादाखल बुलढाण्याचे सरकारी शिक्षक यांचा हा प्रतिसाद :

पुस्तक मैत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मी शाळेत एक–एक उपक्रम राबवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला सर्वांनाच वाटत होते, की मुलांनी इतर पुस्तके वाचायला सुरुवात केली, तर शाळेचा अभ्यासक्रम केव्हा पूर्ण करायचा? हळूहळू मुलांना वाचनातील गंमत कळायला लागली. मुले आवडीने वाचायला लागली. 'हा वर्ग काहीही कामाचा नाही' हा शिक्का पुसण्यात मी यशस्वी झालो.

मी शाळेच्या परिसरात 'तरंगते वाचनालय' सुरू केले. मधल्या सुट्टीमध्ये मीसुद्धा मुलांसोबत पुस्तके वाचू लागलो. त्याचा परिणाम असा झाला, की बरीच मुले वाचायला लागली. काही दिवसांनी पुस्तकांची कमतरता भासायला लागली. मुलांची मागणी वाढतच होती. तेव्हा गावातल्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी त्यांची बंद पडलेली योजना म्हणजेच साखळी ग्रंथालय पुन्हा सुरू केले. एक हजार रुपये डिपॉझिट भरून दर महिन्याला वीस ते पंचवीस पुस्तके मिळायला लागली. या सर्वांच्या नोंदी ठेवण्याची जबाबदारी आठवीतील एका मुलीने घेतली. दर शनिवारी बुकटॉक ॲक्टिव्हिटी घेण्याचे ठरविले. त्याचा परिणाम म्हणजे पाच मुले आठवडाभरात वाचलेल्या पुस्तकांविषयी बोलू लागली, तसेच बरीच मुले वाचलेल्या पुस्तकांवर लिहायलासुद्धा लागली.

एकंदरीत पुस्तक मैत्री कोर्स केल्यानंतर शाळेमध्ये तर वाचनाचे छानसे वातावरण तयार झाले. पालकही वाचायला लागले आहेत. अजून अनेक उपक्रम मनात आहेत.

इतर अनेक सहभागींनीही वेगवेगळ्या पद्धतीने पुस्तके घेऊन काम पुढे न्यायला सुरुवात केली आहे. ते सगळे अनुभव अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि उपयुक्तताच दर्शवतात आणि दुष्यंतकुमारांची कविता आठवत राहते...

*'धीरे धीरे यहाँ का मौसम बदलने लगा है।'*

■■■

# वाचन संस्कृती वाढविणारी शाळा, म्हणजे 'ज्ञानपोई'

**प्रा. बी. एन. चौधरी**
देवरूप, नेताजी रोड,
धरणगाव, जि. जळगाव
भ्रमणध्वनी : ९४२३४९२५९३

*तहानलेल्या माणसाची तहान भागविण्यासाठी पाणपोई असतात, त्याप्रमाणे ज्ञानाची भूक भागविणारी ग्रंथालये ही एका अर्थाने ज्ञानपोई आहेत. मुलांवर वाचनाचा पहिला संस्कार शाळेत होतो. मुलांची जडणघडण वाचनामुळे होते. शाळेतील ग्रंथालयाचेही यात योगदान असते. वाचन संस्कार रुजवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगणारा हा लेख.*

कुंभार जसा माती मळतो, तिच्यावर संस्कार करतो, त्यांना वेगवेगळे आकार देतो, त्या मातीतून भांडी घडवतो, त्याचप्रमाणे लहान मुलांवर जे संस्कार केले जातात, त्या संस्कारातूनच समाजातील वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे घडत असतात. मुलांवर संस्कार घडवणाऱ्यांमध्ये आई, वडील, शिक्षक आणि समाज यांचा मोठा वाटा असतो, तसाच तो पुस्तकांचा आणि ग्रंथांचाही असतो. शालेय जीवनात वाचन हा एक संस्कारच असतो. या संस्कारातूनच उद्याची नवी पिढी उदयाला येत असते.

*कुळी कन्या पुत्र,*
*होती जे सात्त्विक ।*
*तयांचा हरिख, वाटे देवा।।*

या संत वचनानुसार, ज्या घरात मुले शिकून, सुसंस्कारित होतात, ते घर मंदिर होते. अशा मंदिरातील देवांची म्हणजे मुलांची, योग्य पद्धतीने जडणघडण व्हावी लागते. मुले घरातून बाहेर पडली, म्हणजे त्यांचा पहिला संबंध येतो तो आपल्या शाळेशी. ही शाळाच मुलांच्या शिक्षणाला संस्कारांचे कोंदण घालते. वाचनाचा संस्कार रुजवते. शाळेत मुलांचा वाचनाशी पहिला संबध येतो. वाचन व श्रवण म्हणजे पेरणे असते. हे पेरणे जितके सकस, दर्जेदार तितके ते मुलांच्या मनात जोमाने रुजते, म्हणूनच वाचन संस्कृतीच्या विकासात शाळांची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

सध्याच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. ज्ञानाचा जणू विस्फोट झाला आहे. या प्रगतीचे काही तोटेही आपल्यासमोर येत आहेत. यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे टीव्ही, मोबाईल आणि लॅपटॉप. या माध्यमांच्या आपण इतके आहारी गेलो आहोत, की याशिवाय आपण काही वेळदेखील राहू शकत नाही. फेसबुक आणि व्हॉट्सॲप सारख्या समाजमाध्यमांचा, आपल्या जीवनावर इतका पगडा बसला आहे, की एक वेळ आपल्याला जेवण मिळाले नाही तरी चालू शकते; परंतु यांच्याशिवाय आपण जगू शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या माध्यमांनी लहान-थोरांना पुस्तके, वाचनापासून दूर नेले आहे. अर्थात कोणतेही माध्यम हे वाईट नसते. आपण त्याचा कसा आणि किती उपयोग करतो यावर ते चांगले की वाईट हे ठरत असते. गुगल आणि यूट्यूब सारखी माध्यमे तर ज्ञानाचा विशाल महासागरच आहेत. येथे मोठ्या प्रमाणावर जागतिक ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. तिचा वापर कसा करावा हे शाळांनी, शिक्षकांनी मुलांना शिकवायला हवे. वाचनासारखा दुसरा चांगला छंद नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे,

'वाचाल तर वाचाल.' हे खरेच आहे. वाचनामुळे शब्दभांडार व अनुभवांचा खजिना वाढतो. स्मरणशक्ती वाढते. व्यक्तिमत्त्वाचे नवनवीन पदर उलगडत जातात. संबंधित विषयांचे ज्ञान प्राप्त होते. पुस्तक हे एकाच वेळेस आपल्याशी अनेक पातळ्यांवर संवाद साधत असते. खरे तर पुस्तकांसारखा चांगला मित्र, तसेच श्रेष्ठ गुरू दुसरा कोणताच नाही.

मध्यंतरी कोरोनाच्या जागतिक महामारीने जीवन किती क्षणभंगुर आहे आणि पैसा किती कवडीमोल आहे, हे जगाला पटवून दिले. माणसाजवळ पैसा नसला तरी चालेल; परंतु माणुसकी हवी. माणुसकी असेल, तर पैसा मिळवता येईल आणि जगणेही सुलभ करता येईल. म्हणून, आपण कितीही शिक्षित झालो, उच्चपदावर पोहोचलो, तरी माणुसकी धर्म सोडू नये ही शिकवण समृद्ध वाचनातूनच मिळते. वाचनाने आपल्या माणूसपणाच्या कक्षा रुंदावतात. वाचनाने माणसाला एकटेपणापासून दूर ठेवले जाते म्हणून मला असे वाटते, की वाचन आणि पुस्तकांना दुसरा पर्याय असूच शकत नाही.

पुस्तके ज्ञानाबरोबर आत्मविश्वास, आत्मबल व प्रेरणादेखील देतात. शाळेत ज्याप्रमाणे आपले शिक्षक आपले गुरू असतात, त्याचप्रमाणे ग्रंथ हेदेखील आपले गुरूच असतात. म्हणून तर आपण म्हणतो.

*ग्रंथांसारखा गुरू, नाही रे जगात*
*रात्रंदिन संकटात, राहती सोबत !*

गुरू आपल्या मनातील भीती दूर घालवतात. इतरांचा आदर करायला शिकवतात. एक चांगला शिक्षक हा मार्गदर्शक, मित्र, तत्त्वज्ञ असतो. तो प्रेरणा देतो. तीच भूमिका पुस्तके आपल्या जीवनात निभावत असतात. पुस्तके ही घराच्या एखाद्या खिडकीसारखी असतात, ती आपण घरात असलो, तरी आपले जगाशी नाते जोडत असतात. जगाकडे बघायला अवकाश देतात. नवी दृष्टी देतात, म्हणून आपल्या घरात काही पुस्तके हवीच हवी. नियमित वाचन केल्याने आपले बोलणे प्रभावी होते, आत्मविश्वास निर्माण होतो. नवीन नोकरी मिळवताना घेतल्या जाणाऱ्या गटचर्चा, मुलाखती प्रभावी होतात. निर्णयक्षमता वाढते. कथा, काव्य, चरित्र, आत्मचरित्र वाचल्याने दृष्टिकोन व्यापक होतो. शालेय जीवनात वाचनाची गोडी लागली, की ती कालपरत्वे वृद्धिंगत करता येते.

विद्यार्थी जीवनामध्ये, शाळा, शिक्षक व पुस्तक यांच्याशी जसा आपला नित्यनेमाने संबंध येत असतो, तसाच संबंध आपला निसर्गाशीही येत असतो. निसर्गही आपला शिक्षकच आहे. त्याच्याकडे आपण डोळसपणे बघितले, तर तोही आपल्याला अनेक गोष्टी शिकवतो. शाळेत शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना पुस्तकांसोबत निसर्गही वाचायला शिकवला पाहिजे.

शिक्षण घेत असताना, आपण ज्ञान तर मिळवतोच, सोबत संस्कारही मिळवले पाहिजेत. हे संस्कार आपल्याला विनम्र बनवतात. दुसऱ्याचा आदर करायला शिकवतात. दुसऱ्याचे कौतुक करायला शिकवतात. हे संस्कार वाचनातून अधिक दृढ होतात. ग्रंथालये ही विद्यार्थी आणि वाचकांसाठी 'ज्ञानपोईच' असतात. त्यांचे आणि आपल्या गुरुजनांचे आपल्यावर न फिटणारे ऋण असते; म्हणून आपण आयुष्यभर शाळेचे, ग्रंथालयांचे आणि शिक्षकांचे ऋणी राहायला हवे. त्यांच्याप्रति सदैव कृतज्ञ राहायला हवे. त्यांच्या आठवणी आपल्या मनात, नंदादीपाप्रमाणे सदैव तेवत ठेवायला हव्यात.

■■■

# वाचन : एक समृद्ध करणारा प्रवास

**डॉ. जितेंद्र काठोळे**
जिल्हा परिषद माध्य. व कनिष्ठ
महाविद्यालय अकोट, जि. अकोला,
भ्रमणध्वनी : ८६२३९१२८७७

प्रत्येकाचा वाचनाचा हेतू भिन्न असतो. छंद, मनोरंजन, अभ्यास, फावला वेळ घालवायचे साधन, व्यासंग, साधना अशा अनेक वेगवेगळ्या दृष्टीने वाचनाकडे पाहिजे जाते. सर्वसामान्य माणूस छंद, मनोरंजन, वेळ घालवायचे साधन म्हणून वाचतो. तो काय वाचतो हेही महत्त्वाचे असते; म्हणजे तो वृत्तपत्रे, नियतकालिके वाचतो, की ग्रंथ यावरूनही वाचकाच्या वाचनाचा उद्देश लक्षात येतो. ग्रंथ वाचत असेल, तर तो साहित्य वाचतो, की विज्ञान, तत्त्वज्ञान यांवरूनही त्याचा वाचनाचा उद्देश लक्षात येतो. कथा, कादंबरी, काव्यवाचन, निबंध, नाटक प्रवासवर्णन, जीवनोपयोगी साहित्य, आत्मकथा, चरित्र हे वाङ्मयाचे विविध प्रकार जो तो आपल्या आवडी-नुसार वाचतो. विद्यार्थी अभ्यास म्हणून वाचतात ते वाचन ज्ञानसंपादन व ज्ञानवर्धन यासाठी होय. ज्ञान-विज्ञानाच्या आजच्या दररोज विस्तारित होत जाणाऱ्या जगात वरील सर्व प्रकारचे वाचन त्या त्या वाचकवर्गाची दैनंदिन गरज होऊन बसली आहे. पूर्वी केव्हातरी लिखित सामग्री पाठ, प्रकटवाचन हा ज्ञानसाधनेचा अविभाज्य भाग होता. पुढे मनोगत वाचन, एकाग्रपणे केलेले वाचन खरे वाचन बनते. आज पाहणेसुद्धा वाचनाचा प्रकार झाला आहे. वृत्तपत्र, जाहिरात, सिनेमा, दृक्-श्राव्य फीत, चित्र, मोबाईलवरील संदेश, पोस्ट, ब्लॉग्ज इत्यादींवर नजर फिरविणे हे संक्षिप्त वाचनच होय.

> *वाचनाशी संबंधित लेखन, टिपण, संभाषण, वक्तृत्व अशी अनेक कौशल्ये आहेत. या कौशल्यांच्या विकासात वाचन कौशल्याचा सिंहाचा वाटा आहे. स्वतंत्र लेखन करण्यासाठी विपुल वाचन उपयुक्त ठरते.*
>
> *संभाषणातसुद्धा आपल्या वाचनातील संदर्भ, उदाहरणे देऊन आपण आपला स्वतंत्र प्रभाव पाडू शकतो, म्हणूनच विपुल वाचन हाच व्यक्तीचे जीवन समृद्ध करणारा राजमार्ग आहे.*

वाचनाचे महत्त्व अपार आहे, कारण त्याचे फायदे खूप आहेत. विपुल प्रमाणात वाचल्याने आणि चिकित्सक वाचनाने आपल्या अनुभवात भर पडते. अमर्याद माहिती संग्रही राहते, दृष्टी व्यापक होते, अध्ययन सखोल होते, पुन्हा पुन्हा केलेल्या वाचनाने स्मरण होते. विचार/मत निश्चित होण्यास मदत होते. आकलन, बोध व तर्क पातळीत वाढ होते. वाचताना लिहिलेले डोळ्यांनी पाहून ओळखणे एवढेच आपल्याला अपेक्षित नसते. मजकूर व ओळींचा अर्थबोध होणे जरुरीचे असते. लेखन आणि वाचन या क्रिया व त्यांची कौशल्ये एकमेकांशी इतकी निगडित असतात, की एकाशिवाय दुसऱ्याचा अभ्यास शक्य होत नाही. वाचल्याशिवाय लेखन शक्य नाही व लिहिल्याशिवाय वाचन शक्य नाही.

संस्कृती आणि परंपरा यांची ओळख वाचनातूनच होते. सामाजिक, ऐतिहासिक कथा-कादंबऱ्या, भाषांतरित-रूपांतरित साहित्य, नाटक इतर ललित साहित्य यातून त्या त्या भाषिक समूहाची परंपरा, संस्कृती

परिचित होते. रूढी, भ्रम, ग्रह, संकेत, रीतिरिवाज यांचे ज्ञान लिखित मजकुरातून होत असते. साहित्य वाचत असताना लेखकाने उभ्या केलेल्या व्यक्तिचित्रांबरोबर वाचकही स्वतंत्र कल्पनाचित्रे रंगवितो. त्यात आपली कुवत व क्षमतेनुसार भर घालतो. लेखकाचा सूचित अर्थ लक्षात घेऊन नवी प्रतिकल्पनासृष्टी तो उभारतो. साहित्यात लेखकाबरोबरच वाचकांच्या स्वतंत्र कल्पनासृष्टीला म्हणूनच महत्त्व असते. चांगला आस्वाद म्हणजे वाचकाची चांगली कल्पना. विविध विषयांतील पुस्तकांच्या वाचनातून आपला शब्दसंग्रह समृद्ध होतो. शब्दांचा योग्य तो अर्थ, वाक्प्रचार, म्हणी इत्यादी अनेक भाषाविष्कारांच्या परिचयाने आपली भाषिक क्षमता वाढते. लहानपणापासूनच आपल्याला अनेक क्षेत्रांविषयी कुतूहल वाटत असते. वीर राजपुत्र, परी, राक्षस, चेटकीण इत्यादींच्या कुतूहलातून आपण वीरकथा, परीकथा वाचत असतो. विज्ञानकथा, रहस्यकथा आपल्या वाढत्या वयातील कुतूहल पूर्ण करत असतात. थोरामोठ्यांची चरित्रे त्या व्यक्तींचा अतुलनीय पराक्रम, कर्तबगारी आपल्यासमोर ठेवत असतात. प्रवासवर्णने, देशोदेशीचा इतिहास, भूगोल, संस्कृती इत्यादींचा परिचय करून देत असतात. अशा अनेक प्रकारांतील साहित्य वाचनाने आपली जिज्ञासा तृप्त होत असते. विपुल प्रमाणात वाचन केल्यास आपल्याला अनेक विषयांची माहिती मिळते. लेखकांचे जीवनाविषयीचे दृष्टिकोन आपल्याला माहीत होतात. त्यांच्या शैलीची माहिती होते. ही शैली व मते आपला दृष्टिकोन बदलण्यास आपल्याला प्रवृत्त करतात. वाचनाने विचार प्रगल्भ होऊन अनेक कसोट्यांवर आपण ते तपासू शकतो.

लेखन, टिपण, संभाषण, वक्तृत्व अशी अनेक कौशल्ये वाचनाशी संबंधित आहेत. या कौशल्यांच्या विकासात वाचनकौशल्याचा सिंहाचा वाटा आहे. स्वतंत्र लेखन करण्यासाठी विपुल वाचन उपयुक्त ठरते. लिहिण्यापूर्वी वाचलेले असेल, तर टिपण काढणे सोयीचे जाते. संभाषणात पण आपल्या वाचनातील संदर्भ, दाखले देऊन आपण आपली स्वतंत्र छाप पाडू शकतो. आपण कधी मोठ्याने तर कधी मनात वाचत असतो. कधी सहज दुकानांच्या पाट्या, जाहिराती दिसल्या म्हणून, तर कधी जाणीवपूर्वक आवश्यक म्हणून वाचतो, तर कधी फारशी गरज नसतानाही वाचतो. अशा वाचनाचे वाचकांच्या हेतूनुसार, स्वरूपानुसार प्रकार पाडता येतात.

### प्रकटवाचन :

दुसऱ्याला स्पष्ट समजेल अशा रीतीने मोठ्याने केलेले वाचन म्हणजे प्रकटवाचन. लेखकाने लिहिलेले विचार, भावना, कल्पना योग्य त्या विरामचिन्हांसह, योग्य ठिकाणी आघात देत, स्वरांच्या चढउतारासह शुद्ध उच्चार करत श्रोत्यांपर्यंत पोहोचविणे हे वाचकाचे काम असते. वाचन एक कला आहे, अशा कला–कौशल्यांचा उपयोग वक्ता, शिक्षक, वकील, दुभाषी, वृत्तनिवेदक या व्यवसायातील लोकांना होतो.

### मूकवाचन :

मनातल्या मनात स्वतःसाठी केलेल्या वाचनाला मूकवाचन म्हटले जाते. अर्थग्रहणासाठी, आनंदासाठी, अभ्यासासाठी असे वाचन उपयुक्त ठरते. हे वाचन करताना ओठांच्या हालचाली, उच्चारणासाठी लागणारा वेळ व शक्ती खर्च होत नसते.

### अध्ययनप्रवण वाचन :

अध्ययन करणे म्हणजे काय; तर विषयाचे आकलन करणे. चिकित्सा/विश्लेषण करून माहिती मिळविणे होय. आपण जे वाचतो ते अध्ययनासाठी उपयुक्त ठरावे

यासाठी. असे वाचन करताना, विशेषतः विद्यार्थ्यांनी काही गोष्टी लक्षात ठेवाव्या. ज्या घटकांचा अभ्यास करायचा आहे, त्या घटकाचे निरनिराळ्या प्रश्नांत रूपांतर करावे. पाठ्यघटक व उपघटक यांतील विषयांवर सोपे प्रश्न तयार करावे, म्हणजे वाचनाचे उद्दिष्ट निश्चित होईल. उद्दिष्टानुसार वाचन केल्यास ते अर्थपूर्ण होते व वाचनाची गोडी लागते. कोणतेही प्रकरण वाचण्यापूर्वी एकदा चाळणे; म्हणजे लेखकाचा परिचय, शीर्षके, उपशीर्षके, अवतरणे, पाठाची सुरुवात शेवट इत्यादी ओझरते नजरेखालून घालणे. या प्रकारे पुस्तकातील मूलभूत कल्पना समजून येते. आता घटक, उपघटक विभाग यांपैकी एक एक भाग वाचावयास सुरुवात करा. फक्त एका वेळेस एक उपघटक/विभाग एकाग्रतेने वाचा व तुम्हीच तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करा. वाचताना विचार करा. लेखकाला काय म्हणायचे आहे ते समजून घ्या. काय वाचले? कितपत समजले? प्रश्नांची उत्तरे मिळाली का? हे समजून घेऊन पुन्हा उपघटकाचे वाचन करा. आपण जे वाचले ते परत आठवून पाहा. हे मनन जेवताना, फिरताना, इतर कामे करताना आणि कुठेही करता येते. वाचताना जे महत्त्वाचे वाटले, ते नजरेने टिपले जाते. आता तोच मजकूर थोड्या थोड्या कालावधीने वाचा. अशा सरावाने मजकूर लक्षात राहतो व आकलन पूर्ण होते.

### वर्तमानपत्रे व मासिकांचे वाचन :

मुलांना वाचनाची सवय लावताना, त्यांना सर्वांत आधी घरातील वर्तमानपत्र दर दिवशी वाचावयास सांगावे. शाळेत प्रार्थनेच्या वेळी मुले नक्कीच वाचत असतील, पण त्यात केवळ ठळक बातम्यांचा उल्लेख असतो, म्हणूनच मुलांना संध्याकाळी वर्तमानपत्र देऊन त्यांच्या वाचनाचा सराव घ्यावा. वर्तमानपत्र दररोज वाचले, तर मुलांना लहान वयापासूनच सामान्यज्ञान मिळेल तसेच वाचनाची सवय होईल. दररोज वाचनाचा सराव होईल. शब्दांचे उच्चार सुधारतील. वर्तमानपत्रे, मासिके, वेगवेगळे अंक मुलांना वाचावयास सांगावे.

### वयानुरूप वाचन :

मुलांना बालपणापासूनच वाचनाची सवय लावणे गरजेचे असल्यामुळे त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके आणून द्यावीत; पण पुस्तकांची निवड विचारपूर्वक करावी. मुलांच्या वयाप्रमाणे त्यांची आकलनशक्ती विकसित होत असते.

लहान मुलांना जी पुस्तके वाचनाकरिता मिळतील, ती पुस्तके मुलांच्या विचारक्षमतेला अनुसरून असावीत. त्यात लहान मुलांकरिता सोपे सोपे, त्यांना सहजरीत्या आकलन होईल असे शब्द, अशी भाषा असावी. लहान मुलांच्या हातात दिलेल्या पुस्तकात छान छान गोष्टी, चित्रे, कविता यांचा समावेश असावा. जर त्यांना बालपणातच जोडाक्षरे असलेली पुस्तके वाचण्यास दिली, तर त्यांना वाचनाची प्रक्रिया नक्कीच कठीण भासेल व असेही होऊ शकते, की मूल इतर कोणताही विचार न करता वाचनाचा विचार कायमचा मनातून सोडून देईल आणि मुलाच्या मनात वाचनाविषयी नावड निर्माण होईल. त्यामुळेच मुलांचे वय लक्षात घेऊन त्यांना पुस्तके दिली, तर आपण मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करू शकतो.

### अक्षरांचे ज्ञान :

वाचनाकरिता मुलांना सर्वांत आधी अक्षरांचे ज्ञान, तसेच त्या अक्षरांचे योग्य उच्चारण ज्ञात असले पाहिजे, तेव्हाच ते मूल योग्य पद्धतीने वाचन करू शकेल. त्यामुळे मुलांना आधी अक्षरे शिकवावी, त्या अक्षरांचे तसेच त्यांच्यापासून नवीन तयार झालेल्या

**(पृष्ठ क्र. ४० वर)**

# डिजिटल वाचन

**डॉ. विशाल तायडे**
प्रादेशिक विद्या प्राधिकरण,
औरंगाबाद.

आज वाचन संस्कृतीविषयी सातत्याने चर्चा होत असते. वाचन संस्कृती लोप पावत आहे, आजचे तरुण वाचन करतच नाहीत, लहान मुले तर कायम टीव्हीसमोर असतात, पुस्तकांपेक्षा मोबाईल सर्वांना अधिक जवळचा झाला आहे, असे एक ना एक मुद्दे ऐरणीवर आलेले दिसत आहेत. त्यांवर आणि त्यामुळे होणारे व्यक्तिगत आणि सामाजिक दुष्परिणाम अशा अनेक मुद्द्यांवर नेहमी उलटसुलट चर्चा सुरू असते. विशेषतः साहित्य संमेलनाच्या निमित्ताने तर अशा चर्चांना अधिक पेव फुटतो. या पार्श्वभूमीवर वाचन संस्कृतीचा विचार करता, असे लक्षात येते, की वाचनाला मोठा इतिहास आहे. लेखन आणि वाचन हे हातात हात घालून इतिहासाचा दीर्घ प्रवास करत येथपर्यंत आलेले आहेत. पूर्वी दगडांवर, पानांवर, धातूंवर लेखन करून ते वाचले जायचे. नंतर ते लेखन कागदावर आले. छपाईचे तंत्र विकसित झाल्यानंतर वाचन अधिक सुकर झाले. जगभरात कित्येक शतके लोक छापलेले वाचत आहेत. मात्र अलीकडच्या काळात हीच छापील अक्षरे इंटरनेटच्या माध्यमातून आता स्क्रीनवर झळकायला लागली आहेत. विसाव्या शतकात तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. संपर्क माध्यमाची साधने बदलली, मात्र माणसाची ऐकण्याची, वाचण्याची किंवा बघण्याची आवड कायम राहिली. ज्ञानार्जनाची ऊर्मी कधीही कमी झालेली नाही; उलट तंत्रज्ञानामुळे ज्ञान मिळवणे अधिक सुकर झाले आहे. आज स्मार्टफोन बाळगणे आणि त्यावर इंटरनेटचा वापर करणे ही अगदी सामान्य बाब झालेली आहे. इंटरनेटच्या परवडणाऱ्या दरांमुळे तर हा वापर अधिक प्रमाणात वाढला आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या हातात रुळलेला स्मार्टफोन हा उद्योग, कला, राजकारण, शिक्षण, पत्रकारिता अशा सगळ्या क्षेत्रांसाठी एक पर्वणीच ठरलेला आहे. प्रत्येकाच्या सर्जनशीलतेला हक्काचे आणि मुक्त व्यासपीठ या माध्यमातून प्राप्त झाले आहे. यू-ट्यूबसारख्या माध्यमातून दृक्श्राव्य स्वरूपात मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत आहे. त्याचवेळी व्हॉट्सॲप, फेसबुक, प्रतिलिपी, टेलिग्राम, ई-मेल अशा माध्यमांतून निर्माण होणारे लिखित साहित्य हे प्रत्येकाच्या आवाक्यातील एक बाब झालेली आहे आणि त्याचा वाचकवर्गही प्रचंड आहे.

> *पूर्वीच्या काळी शिलालेखापासून सुरू झालेले वाचन-लेखन आता ई-बुकपर्यंत येऊन पोहोचलेले आहे. मोबाईल, संगणक, लॅपटॉप या साधनांच्या माध्यमातून नेटद्वारे वाचन केले जाते. ई-बुक, पीडीएफ स्वरूपात आता पुस्तके उपलब्ध आहेत. ती जगभरात कुठेही उपलब्ध होतात. वाचता येतात. ई स्वरूपातील वाचनामुळे वाचनाची व्याप्ती वाढलेली आहे. त्यामुळे अनेकांची सोय झाली आहे. तसेच ई-बुकचे काही तोटेही आहेत. या सर्वांचा साधकबाधक विचार मांडणारा अभ्यासपूर्ण लेख.*

पूर्वी पुस्तक प्रसिद्ध करणे हे प्रत्येकाला शक्य होत नव्हते. अनेक लेखकांचे उत्तम साहित्य प्रसिद्धीच्या यंत्रणाच माहीत नसल्याने व्यक्तिगत वह्यांच्या पानांपुरतेच

मर्यादित राहिले. ते वाचकांपर्यंत पोहोचू शकले नाही. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील, मात्र आजच्या डिजिटल युगात कोणीही आपले ई–बुक प्रसिद्ध करू शकतो. आज ॲमेझॉनसारखी जागतिक स्तरावरची कंपनी उत्तम साहित्य प्रसिद्ध करायला उत्सुक आहे आणि तिथपर्यंत कसे पोहोचायचे याचे मार्गदर्शनही इंटरनेटवर उपलब्ध आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या माध्यमातून अत्यंत अल्प खर्चात लेखकांना जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे काळानुसार आणि तंत्रज्ञानाच्या विकासाप्रमाणे वाचनाची माध्यमे बदललेली दिसून येतात. आज आकाराने जाडजूड पुस्तके वाचणारा वाचक कमी झाला आहे, हे मान्य करावे लागेल. वाचकांची आवड आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेला वेळ याचा विचार करून डिजिटल कंटेंटही मोठ्या प्रमाणावर बदललेले आहेत. ब्लॉगची निर्मिती हा कदाचित याच विचारांचा परिपाक असू शकतो. ब्लॉग तयार करणे आणि आपले विचार सहजतेने वाचकांपर्यंत पोहोचवणे हे थोड्या प्रयत्नाने कोणालाही सहज शक्य होणारी बाब आहे. असे शेकडो ब्लॉग्ज दररोज लिहिले जातात आणि इंटरनेटच्या माध्यमातून जगभर फिरत असतात. चांगल्या ब्लॉग पोस्टला मिळणारा वाचकांचा प्रतिसाद हा आश्चर्य वाटावा असाच आहे आणि असे कमी शब्दसंख्या असलेले ब्लॉग थोड्याच वेळात, अगदी प्रवासातही वाचून होतात. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे ही ब्लॉग निर्मिती अनेकांच्या उत्पन्नाचे साधनही बनलेली आहे. आपल्या लेखनाला वाचकांचा तात्काळ मिळणारा प्रतिसाद हा लेखक म्हणून त्या ब्लॉग लेखकाला सुखावणारा आणि शिकवणाराही असतो. आपल्या आवडत्या विषयावरील साहित्य वाचण्यासाठी गुगलच्या सर्च इंजिनवर केवळ त्या विषयाचे नाव टाकले, तरी त्या त्या विषयावर आधारित कित्येक ब्लॉग आपल्यासमोर येतात. याच ॲमेझॉनने डिजिटल वाचकांना समोर ठेवून निर्माण केलेले किंडलसारखे साधन हा वाचन प्रक्रियेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. किंडल व त्यासारख्या साधनांच्या माध्यमातून लक्षावधी डिजिटल पुस्तके मोफत किंवा अल्पदरात वाचकांना उपलब्ध होऊ शकतात. एका वेळी शेकडो डिजिटल पुस्तके इंटरनेटवरून डाऊनलोड करून आपण या साधनांच्या माध्यमातून आपल्या जवळ बाळगू शकतो. त्याचप्रमाणे इंटरनेटवरही उपलब्ध असलेल्या अनेक वेबसाईटवरही अशा प्रकारची डिजिटल पुस्तके मोठ्या प्रमाणावर आपल्याला प्राप्त होऊ शकतात. या डिजिटल युगात हवे ते वाचनसाहित्य मिळवणे ही अवघड बाब राहिलेली नाही. इंटरनेटच्या साहाय्याने एका क्लिकवर साहित्य मिळवता येते.

तीन वर्षांपूर्वी कोरोना व्हायरस हा संपूर्ण जगासमोर यक्ष प्रश्न होता. अतिशय वेगाने सर्वत्र पसरणाऱ्या या व्हायरसने लोकांना चार भिंतींच्या आत कोंडून घ्यायला भाग पाडले होते. या काळात शाळा बंद होत्या. दुकाने बंद होती, जग जणू थांबल्यासारखे झाले होते. सर्व व्यवहार ठप्प होते. कोणी कोणाला सहजपणे भेटू शकत नव्हते. अशा वेळी माणसांना जोडणारा दुवा म्हणून मोबाईल आणि इंटरनेट यांनी फार महत्त्वाची भूमिका बजावली होती. आपण अगदी सहजतेने एकमेकांच्या संपर्कात राहू शकत होतो. या लॉकडाऊनच्या काळात जगभरातील डिजिटल वाचनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे अनेक सर्वेक्षणांमध्ये दिसून आलेले आहे. कोरोनाची भीतीच इतकी होती, की लोक बाजारातील पुस्तकांना व वर्तमानपत्रांनाही हात लावायला तयार नव्हते. अशा वेळी ते डिजिटल कंटेंटकडे अधिक प्रमाणात वळले. रोजचे वर्तमानपत्र वाचण्याची सवय असणारे अनेक जण लॅपटॉप व मोबाईलवर ई–वर्तमानपत्र वाचताना दिसू लागले. नियमित वाचनाची आवड असणाऱ्या मंडळींसाठी तर लॉकडाऊनचा कालखंड ही एक मोठी पर्वणीच होती.त्यांनी मिळालेल्या

वेळेचा सदुपयोग ऑनलाईन साहित्य वाचण्यासाठी केला. अनेक पुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या निघाल्या. पीडीएफ स्वरूपातील पुस्तके व इतर वाचनसाहित्य इंटरनेटद्वारे जगभर प्रवास करताना आपण पाहिले आहे. यात काही गैरप्रकारही दिसून आले. कॉपीराईट असलेले साहित्यही अवैधरीत्या फॉरवर्ड होत राहिले. आज सोशल मीडिया आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे. भीती वाटावी इतक्या मोठ्या प्रमाणात आपले विचारविश्व सोशल मीडियाने व्यापून टाकले आहे, किंबहुना त्यामुळे आपली विचार प्रक्रियाच थांबली असल्याचे म्हटले जाते. ही मर्यादा लक्षात घेऊनही आपल्याला एक वाचक बनविण्यात सोशल मीडियाचा मोठा सहभाग आहे, हे मान्य करावे लागेल. पुस्तकांची आवड नसणारी मंडळीही सोशल मीडियावरील साहित्य आवडीने वाचताना दिसतात. इतकेच नाही, तर सोशल मीडियावरील वाचकांची आवड लक्षात घेऊन पुस्तके लिहिण्याचा नवीन ट्रेंड तयार झाला आहे.

अलीकडच्या काळात शिक्षणक्षेत्रातही डिजिटल साहित्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. उच्च शिक्षणात महागडी पुस्तके व संदर्भ साहित्य डिजिटल स्वरूपात अत्यंत अल्प किमतीत विद्यार्थ्यांना प्राप्त होऊ शकते. ते पीडीएफ स्वरूपात उपलब्ध असल्याने आपला मोबाईल, टॅब किंवा लॅपटॉपवर घेऊन, पाहिजे तेव्हा विद्यार्थी त्याचे वाचन करू शकतात. डिजिटल साहित्याने शिक्षणक्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. जगभरातील त्या त्या विषयातील तज्ज्ञांचे संदर्भ साहित्य अगदी सहजतेने विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकते.

प्राथमिक शिक्षणातही डिजिटल साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध झालेले आहे. बालभारतीने सर्व इयत्तांची पाठ्यपुस्तके ई–बालभारती या पोर्टलवर विनामूल्य उपलब्ध करून दिली आहेत. डिजिटलायझेशनमुळे वाचन साहित्याचे झालेले सार्वत्रिकीकरण हा जरी कौतुकाचा विषय असला, तरी त्यातून समोर आलेले गैरप्रकारही दुर्लक्षित करून चालणार नाहीत. कॉपीराईटचा भंग हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्याचप्रमाणे वाङ्मयचौर्य मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येत आहे. समाज माध्यमांवर तर सातत्याने हा प्रकार होताना दिसून येतो. त्याचप्रमाणे समाज माध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यावरही नियंत्रण असायला हवे. समाज विघातक शक्ती अशा माध्यमांचा गैरवापर आपला हेतू साध्य करण्यासाठी करताना दिसून येतात. हे डिजिटल वाचन साहित्य वाचकांना जितके सहजतेने उपलब्ध होणारे आहे, तितकेच ते धोकादायकही आहे. समाजात गैरसमज पसरविणारे साहित्य प्रसारित करणे, एखाद्याची मानहानी करणे, चुकीची मते नोंदविणे असे प्रकार समाज माध्यमांवर सातत्याने होताना दिसून येतात. या प्रकारांना वेळीच आळा घालणे ही काळाची गरज आहे; असे असले तरी आज डिजिटल स्वरूपातच वाचन करणारा एक मोठा वर्ग समाजात आहे. आपल्याकडे हे प्रमाण कमी असले तरी परदेशात अधिक आहे. आपल्याकडेही दिवसेंदिवस डिजिटलायझेशनचे प्रमाण वाढत आहे. काळानुसार वाचनाचे माध्यम जरी बदलले असले, तरी वाचन संस्कृती लोप पावणार नाही, कारण डिजिटल माध्यमे ही ज्ञानाचा सागर आहेत. त्यांच्या मर्यादा व त्यातील दोष दूर करून आपल्याला स्वतःलाही काळाप्रमाणे बदलत राहावे लागणार आहे; किंबहुना आपल्याला काळाच्या प्रवाहात टिकून राहण्यासाठी हा स्वीकार आणि त्याचा अवलंब करणे हे अपरिहार्य आहे.

# माझे वाचन विश्व

**डॉ. कैलास दौंड**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हंडाळवाडी
ता. पाथर्डी, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११

*लेखक कवी म्हणूनही परिचित असलेले डॉ. कैलास दौंड हे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक आहेत, बालपणापासून त्यांच्यावर झालेले वाचन संस्कार, त्यातील शाळेचे योगदान व स्वत: वाचनासाठी केलेले प्रयत्न, यांविषयी सांगताना अनेक साहित्यिकांच्या साहित्याचा संदर्भ देत त्यांनी आपली वाचन वाटचाल मांडली आहे.*

वाचनाची भूक कधीच शमत नाही. उलट वाचन करत राहिल्याने ती अधिकच वाढत जाते. खाद्यपदार्थाने शरीराला ऊर्जा मिळते आणि वाचनाने मेंदूला खाद्य मिळते. 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे' असे समर्थ रामदासांचे वचन प्रसिद्ध आहे. वाचन माणसाला अद्ययावत ठेवते. वाचनामुळे बुद्धी तर वाढतेच, त्याचबरोबर संवेदनशीलता आणि कल्पनाशक्तीही वाढते आणि वैचारिक भूमिका पक्की होण्यासाठी वाचनच उपयोगी असते. वाचनसाहित्याची उपलब्धता ही आजच्या काळाची देणगी आहे. विश्वासार्ह वाचन साहित्याची निवड आणि उपलब्धता याला काही पर्याय असू शकणार नाही, हे खरेच.

तालुक्याच्या गावा–पासून पंचवीस किमी दूर असणारे सोनोशी हे माझे गाव. येथेच माझे इयत्ता तिसरी ते सातवी पर्यंतचे शिक्षण झाले. शाळेच्या कपाटात असतील, तीच काय ती वाचनासाठीची पुस्तके. शाळकरी मुलांना तर क्रमिक पुस्तकेही एकमेकांची जुनी विकत घ्यावी लागत असत. घरात जर मोठी भावंडे असतील, तर लहानांना त्यांच्यामार्फत काही खास वाचायला मिळण्याची शक्यता असायची. चार भावंडांतील सर्वांत लहान म्हणून ती संधी मला मिळाली.

शालेय वयात वरच्या वर्गातील विद्यार्थी म्हणत असलेल्या कविता ऐकून त्यांच्या पुस्तकाविषयी आकर्षण निर्माण होई. ती वाचायला मिळावीत म्हणून त्या मुलांशी मैत्री करावी लागे. कधी सुट्टीत मामाच्या गावी गेलो, की तिथल्या फडताळात मामांनी आणून ठेवलेली पुस्तके सापडत. त्यात हिंदी पॉकेट बुक्स स्वरूपातील उपन्यास असत. चांदोबा मासिकाचेही काही अंक असायचे. मला चांदोबा खूप आवडायचे. त्यामधील राजा, राणी, डाकू, विक्रम, वेताळ यांची चित्रे पाहून त्या गोष्टी वाचाव्याशा वाटायच्या. गोष्टी वाचता वाचता आपले मनदेखील गोष्टीतील एक पात्र होऊन जाते. चित्रांमुळे पाठ्यपुस्तकेदेखील इतकी मन लावून वाचायची सवय लागली, की एकदा वाचलेल्या पाठाचा सारांश एखाद्या गोष्टीप्रमाणे लक्षात राहू लागला.

१९८४–८५ हे माझे सातवीचे वर्ष होते. वर्गात एक पुस्तकाचे कपाट होते. त्यात काही छोटी–मोठी पुस्तके होती. हिमगौरी आणि सात बुटके, संत गाडगेबाबा अशी पुस्तके तिथून घेऊन वाचल्याचे आठवते. या वर्षी काही कारणाने आमचे कुटुंब शेतातील वस्तीवरून गावठाणातील धाब्याच्या घरात राहायला आले होते. तेथील फडताळातही काही पुस्तके मिळाली. त्यात माझे विद्यापीठ, निर्वासित चिनी मुलास, कमला हे खंडकाव्य, लज्जागौरी, रक्तकमळे यांचा समावेश होता.

ही पुस्तके माझ्या नुकतेच बी.एड. झालेल्या काकांची होती. ही पुस्तके मला खूप आवडली, पण पूर्ण वाचून झाली नाहीत. माझे विद्यापीठ मात्र दोन वेळा वाचले.

हायस्कूलचे शिक्षण 'येळी' या गावी झाले. इयत्ता आठवीला असताना दहातोंडे आडनावाचे आमचे वर्गशिक्षक होते. त्यांनी दर सोमवारी प्रत्येक विद्यार्थ्याला एक पुस्तक वाचण्यासाठी देण्याचा उपक्रम सुरू केला. त्यासाठी प्रत्येकाला एक वही करायला लावली. त्यात पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव आणि पुस्तकातील काही माहिती लिहायला सांगितली. दिलेले पुस्तक एक-दोन दिवसांतच वाचून होई, मग पुस्तकांची परस्पर अदलाबदल करून इतरांना दिलेलेही आणखी एखादे पुस्तक वाचून होई. एका वर्षभरात किशोरवयीन बालकांसाठी असणारी जवळपास पन्नासएक पुस्तके वाचायला मिळाली. शिक्षकांचा हा उपक्रम मला खूपच आवडला. नंतर हा उपक्रम मी एक वर्ष नवोपक्रम म्हणून माझ्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी नागापूरवाडी (संगमनेर) येथे राबवला.

पाथर्डीला अकरावीच्या वर्गात असताना लायब्ररी कार्डही मिळाले. त्यावर एक अभ्यासाचे पुस्तक व एक अवांतर वाचनासाठीचे पुस्तक घेता येई. या एक वर्षात अनिल बर्वे, गंगाधर गाडगीळ, द. ता. भोसले, अमर शेख, अनंत काणेकर, वसंत कानेटकर, कुसुमाग्रज, आनंद यादव, रमेश मंत्री यांच्या काही पुस्तकांचे वाचन करता आले. त्यामुळे हे वर्ष अवांतर वाचनाच्या दृष्टीने लक्षात राहील असेच होते. नंतर डी.एड. कोर्ससाठी नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतला. येथे हुतात्मा स्मारक वाचनालय आणि आणखी एक मोठे वाचनालय होते. दररोज सायंकाळी तेथे जात असे. विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, रविवार पुरवण्या असे खूप वाचायला मिळायचे. डी.एड. झाल्यावर पुणे विद्यापीठाच्या बहिःस्थ विभागात बी.ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. घरी बसून काय करणार म्हणून तालुक्याच्या गावी प्राचार्यांच्या परवानगीने नियमित तासांना जाऊ लागलो. ग्रंथपालांची ओळख करून घेतली. अनिल बर्वे यांचे थँक्यू मिस्टर ग्लाड, केशवसुतांच्या कविता व इतर काही पुस्तके वाचली. गावातील मंदिरात दरवर्षी पांडवप्रताप, हरिविजय अशा ग्रंथांचे वाचन करायला मिळे. साखरेबुवांनी संपादित केलेल्या सार्थ ज्ञानेश्वरीचे आणि संत तुकाराम गाथेचे वाचनही या काळात केले.

ऑगस्ट, १९९२ मध्ये रायगड जिल्हा परिषद मांडवणे, ता. कर्जत येथे प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झालो. जवळच्या वैजनाथ नावाच्या गावी ग्रामपंचायतीचे वाचनालय होते हे कळल्यावर वाचनालयाचे सभासदत्व घेतले. मी वाचनालयातली जुईली, कार्टी प्रेमात पडली- नाटक, एल्गार, गारंबीचा बापू, झाडाझडती अशी पुस्तके वाचली.

रामकृष्ण मठाची स्वामी विवेकानंद चरित्र, राजयोग, प्रेमयोग, ग्रंथावली ही पुस्तके विकत घेऊन वाचली. किशोर आणि जीवन शिक्षण ही मासिकेही नियमित वाचत होतो. पुढे लवकरच मुरलीधर बागुल नावाचा एक वाचक मित्र भेटला त्याच्याकडून बलुतं, मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे, आभरान, बगाड, भस्म्या, ऐसा गा मी ब्रह्म, काट्यावरची पोटं, नव्या माणसाचे आगमन अशी काही पुस्तके वाचयला मिळाली.

१९९३ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात नव्याने नोकरीस लागलो. संगमनेर येथे शिवाजी चौकात हातगाडीवर एक गृहस्थ दिवाळी अंक, मासिके, जुने दिवाळी अंक विकत असत. तिथून महाराष्ट्र टाइम्स, दीपावली, मौज, अबकडई, साधना, युगांतर ची आधीच्या वर्षीचे दिवाळी अंक माफक किमतीत वाचायला मिळाले. दर रविवारी उपलब्ध महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, लोकमत या वृत्तपत्राच्या त्या काळी वाचनीय असलेल्या पुरवण्या

वाचत असे. शासनाने प्राथमिक शाळांसाठी सुरू केलेल्या ऑपरेशन ब्लॅक बोर्ड योजनेअंतर्गत माझी शाळा होती. या शाळांना बालसाहित्याची भरपूर पुस्तके भेट म्हणून येत, ती मी सगळीच वाचून काढत असे. मुलांनाही हाताळायला देई, वाचून दाखवी, वाचायला लावी. प्रख्यात लेखक आनंद यादव यांनी सांगितल्यावरून बडोदे येथील एका ग्रंथप्रेमी व्यक्तीने माझी 'अंतर्नाद' या मासिकाची तीन वर्षांची वर्गणी भरली होती, ही घटना माझ्यासाठी अविस्मरणीयच.

नंतरच्या काळात माझ्याकडे येणाऱ्या पुस्तकांची संख्या बऱ्यापैकी वाढली. मला आत्मकथने, बालसाहित्य आणि शिक्षणविषयक पुस्तके वाचायला आवडतात. नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके व आवडणारी आधीची पुस्तके वाचनासाठी विकत घेतल्यामुळे आता माझा स्वतःचादेखील मोठा पुस्तकसंग्रह झाला आहे. विद्यावाचस्पती पदवीच्या (Ph.D.) निमित्ताने मराठी कादंबरी आणि कादंबरी समीक्षाविषयक पुस्तकांचे मोठ्या प्रमाणात वाचन झाले. अनेक पुस्तके भेट येतात तर हवी असलेली पुस्तके विकत घेतो. एकंदरीत काय तर Robert Frost यांच्या शब्दात –

"The woods are lovely, dark and deep. But I have promises to keep, and miles to go before I sleep." असाच अनुभव आहे वाचनाचा.

■■■

---

**(पृष्ठ क्र. ३४ वरून)**

शब्दांचे उच्चारण कसे करतात, हे ज्ञात करून द्यावे. त्याकरिता लेखनाचा सराव महत्त्वाचा आहे; जेणेकरून मुलांना वाचन करणे सोपे जाईल.

**वाचन विकास :**

वाचन प्रक्रियेत हळूहळू प्रगती होत जाते, तसतशी आपल्या ज्ञानकोषात भर पडत जाते. वाचनास वयाची मर्यादा नसते. कोरोनाच्या दोन वर्षांत अनेक बदल झाले, त्यात सर्वांत मोठा प्रभाव पडला तो मुलांच्या वाचनावर! जी सवय मोडली गेली, तीच सवय आता पुन्हा लागण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी शाळेत शिक्षक वेगवेगळे उपक्रम राबवू शकतात. जसे की; पुस्तके वाचण्याकरता वाचनालयाशी संबंधित एक अर्ध्या तासाचा वेळ मुलांना देऊन त्यांना वाचनालयातील त्यांच्या आवडीची विविध पुस्तके आणून द्यावीत किंवा मुलांना वाचनालयात न्यावे. त्यांना कोणतीही गोष्ट किंवा प्रसंग वाचल्यानंतर त्या साहित्याचा सारांश सांगण्याकरता प्रेरित करावे. सारांश ऐकल्यानंतर इतरांना साहित्यावर आधारित प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन द्यावे किंवा प्रार्थनेच्या वेळी एका छोट्याशा नाट्याच्या माध्यमातून आपण मुलांना वाचनाचे महत्त्व पटवून देऊ शकतो. मुलांना वाचनाकरता प्रोत्साहन मिळणे सर्वप्रथम गरजेचे आहे. माणूस म्हटल्यानंतर चुका या कधीमधी होणारच. वाचनाच्या बाबतीतसुद्धा मुले चुका करणारच. शब्दांचे चुकीचे उच्चारण करणे, शब्द अर्धवट व तुटकतुटक वाचणे, वाक्यातील विरामचिन्हे गाळणे, वाचण्याची गती कमी जास्त होणे अशा अनेक चुका मुलांकडून होण्याची शक्यता असते; पण या छोट्याछोट्या चुकांमुळे ती निराश होणार नाहीत हे पाहिले पाहिजे. आपण मुलांना सांभाळून घेतले पाहिजे, समजून घेतले पाहिजे. वाचताना चुकतात म्हणून जर आपण मुलांवर रागावलो किंवा तुला हे वाचायला जमणारच नाही, असे जर त्यांना म्हणालो तर मुले निराश होऊन वाचन सोडून देतील. त्यांची आवड टिकवणे हेच आपले ध्येय आहे; कारण वाचन हाच माणसाला समृद्ध करणारा एकमेव ज्ञानमार्ग आहे.

■■■

# शिक्षण जीवन कौशल्यांचे

**अरुण जाधव**
सीपीडी विभाग,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
भ्रमणध्वनी : ९४२३५३७९२७

जीवनात वृत्ती सदा आनंदी ठेवून,
जीवन कौशल्यांचे घेऊया प्रशिक्षण.

जीवनात भाषेचे परिणामकारक संप्रेषण,
जीवनाच्या गणितात समस्या निराकरण.

जीवनात करूनिया भावनांचे समायोजन,
जीवन जगताना ताणतणावांचे व्यवस्थापन.

जीवनात सर्जनशील विचार घेऊनिया,
जीवन जगू चिकित्सक विचार करूनिया.

जीवनात व्यक्ती–व्यक्तींमधील सहसंबंध ठेवूनिया,
जीवन ओळखीत प्रथम स्वची जाणीव ठेवूया.

जीवनात स्वानुभवाने वाढवूया निर्णयक्षमता,
जीवन जाणूया समानानुभूतीने जगता जगता.

जीवन कौशल्याने माणसे घडवावी,
जीवनाच्या ज्ञानमंदिरावर ध्वजा यशाची फडकावी.

# भाषिक खेळ

**लक्ष्मण शेडगे**
भरतगाव, ता. जि. सातारा
भ्रमणध्वनी : ८३०८३०४३७२

खालील चौकोनातील दिलेल्या अक्षरांतून रिक्त जागी अचूक अक्षर लिहून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | मि | मि | लि | लि | ति | ति | नि |
| कि | प्रि | ल | ल | म | र | ष | नं |

| | | |
|---|---|---|
| सु | | मा |
| | | |
| या | | नी |

| | | |
|---|---|---|
| सु | | न |
| | | |
| दा | | नी |

| | | |
|---|---|---|
| मा | | नी |
| | | |
| न | | ता |

| | | |
|---|---|---|
| प्र | | भा |
| | | |
| मा | | ती |

'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक.

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director.

## इतिहासाच्या पानांवरून

**श्रीकांत चौगुले**
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

# शालापत्रक अंकाचे 'वाचन आणि संवर्धन'

साधारण शंभर, सव्वाशे वर्षांपूर्वी आजच्यासारखी संदेशवहनाची साधने नव्हती. आकाशवाणी, दूरदर्शन नव्हते. वृत्तपत्रे मोजकीच होती, ती खेडेगावापर्यंत पोहोचणे अवघडच. गावात अधिक शिकलेला जाणता माणूस शिक्षकच असायचा. त्याचा व्यासंगच त्याच्या शहाणपणाचे लक्षण असायचे. अशा काळात शाळेत येणाऱ्या शालापत्रक अंकाचे महत्त्व खूप असायचे.

बहुतांश शिक्षक अंकाची वर्गणी भरून, स्वतः अंक घेत असत, तर काही लोकल बोर्डांनी स्वतः वर्गणी भरून शाळांना अंक पोहोचविण्याची व्यवस्था केलेली होती.

मे १८९३ च्या अंकात डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर, ठाणे यांचे एक पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यांनी ठाणे लोकल बोर्डाच्या शाळेतील शिक्षकांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये शालापत्रकाचे वर्षभरातील अंक एकत्र करून ते शिवून, त्याचा एकत्रित ग्रंथ तयार करावा व त्याची नोंद शाळेच्या रजिस्टर नंबर पाचवर घेण्यात यावी व अंकाचे संवर्धन करावे असे कळविले आहे. यावरून सुरुवातीच्या काळात या अंकाचे महत्त्व किती होते हे लक्षात येते.

ठाण्याचे तत्कालीन उपशिक्षणाधिकारी आर. व्ही. गद्रे यांचे २९ एप्रिल, १८९३ चे हे पत्र असून, त्यावरून त्या अधिकाऱ्यांचीही वाचन संस्कृती विषयीची आणि अंक जतन करण्याची तळमळ दिसून येते.

सुरुवातीपासून अंकात वाचकांची पत्रे छापत असत. त्यामध्ये अनेक शिक्षक आपल्या शैक्षणिक अडचणींविषयी प्रश्न विचारत. त्याला अंकातूनच उत्तरे दिली जात. तसेच शाळांमध्ये लोकसहभागातून कोणकोणत्या वस्तू घेतल्या, काय काय सुधारणा केली. याबाबतही शिक्षक कळवत. त्याचे वृत्तांतही संक्षिप्त रूपात अंकात दिलेले दिसतात. असा वाचक-संपादक संवाद सुरू असल्याचे दिसते. अगदी वाडीवस्तीतून आलेली पत्रे पाहायला मिळतात. यावरून अंक अगदी खेड्यापाड्यात जात होता. त्याचा सर्वत्र वाचक वर्ग होता असे दिसते. यावरून शालापत्रक अंकाचे तत्कालीन काळातील महत्त्व अधोरेखित होते.



केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (KPALP) च्या Five Year Celebration कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी सी. पी. डी. विभाग, युनिसेफ, महाराष्ट्र, मुंबई, CEQUE संस्था यांच्या वतीने तयार करण्यात आलेले पायाभूत प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण व PLC चे घटक संच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे देताना मा. श्री. शरद गोसावी, संचालक (प्र.), मा. श्री. रमाकांत काठमोरे, सहसंचालक, मा. श्री. किल्लेदार बसवेश्वर, सहा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, मा. श्रीम. मैथिली गुप्ते, युनिसेफ, महाराष्ट्र, मुंबई, मा. श्रीम. वर्षा परचुरे, CEQUE संस्था व अन्य मान्यवर.

केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (KPALP) च्या Five Year Celebration कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. श्री. रमाकांत काठमोरे, सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
त्याप्रसंगी मा. श्री. शरद गोसावी, संचालक (प्र.), मा.श्रीम. मैथिली गुप्ते, युनिसेफ, महाराष्ट्र, मुंबई, मा. श्री. किल्लेदार बसवेश्वर, सहा. संचालक, श्री. अरुण जाधव, सी. पी. डी. विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.





केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (KPALP) च्या Five Year Celebration कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी प्रास्ताविक व मार्गदर्शन करताना श्री. अरुण जाधव, सी. पी. डी. विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. त्याप्रसंगी उपस्थित राज्यातील सर्व तज्ज्ञ मार्गदर्शक व मा. श्री. शरद गोसावी, संचालक (प्र.), मा. श्री. रमाकांत काठमोरे, सहसंचालक, मा. श्री. किल्लेदार बसवेश्वर, सहा. संचालक, श्रीम. मनिषा यादव, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, मा. श्रीम. मैथिली गुप्ते, युनिसेफ, महाराष्ट्र, मुंबई.




केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (KPALP) च्या Five Year Celebration कार्यशाळेमध्ये आपले अनुभव व्यक्त करताना डॉ. दत्तात्रय थिटे, वरिष्ठ अधिव्याख्याता, संशोधन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

Date of Publication 3 June 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th June 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ______________________